नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

पिकले पान ....

भावमीलन ....
नवे-जुने...............
तिकडचे सारे काही ....
उन्हांत तांबूस..........

चल चल सजणी............

श्रीनिवास नारायण बनहट्टी............

नवनिर्मिती आणि टीकाखोर वृत्ति ....

मराठशाहीतील ऐतिहासिक स्त्रियांचे कर्तृत्व............

सुशिक्षित दगड..................

शरद ऋतूतील संध्याकाळ.........

विदभ   साहित्यसंघ : पूर्वपीठिका व सिंहवलोकन..............
पुस्तकांचे स्त्रीत्व.......................
गुप्त सरस्वती.............

संपादकीय....................

विदर्भ-साहित्य-संघवार्ता..............

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष १ लें | जानेवारी १९४६ | पुष्प १ लें
संपादक—वामन नारायण देशपांडे.

२ भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
36390
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 10.2.98
9
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

पिकलें पान

पद्य मजला येईल करूं जातां,
त्यांत ओतूं मी काव्य कसें आतां ?
अंगिं नुरतां निर्माणशक्ति * लेश
—कसा यावा भर काव्यकौमुदीस ? १

स्फूर्तिशक्तीचा होय लुप्त ‘ मंत्र ’
तिथं झालें विकलांग वहन ‘ यंत्र ’
‘ तंत्र ’ विस्मरलों, होय मी उदास !
—कसा यावा भर काव्यकौमुदीस ?

एक नैसर्गिक जन्म सर्वमान्य
अन्य होतो संस्कारकर्म-जन्य †
छटा यांच्या होतां न एकजीव
काव्यसौंदर्यीं भासते उणीव ! ३

काव्यदेवी-देउळीं-गर्भभागीं § —
शिरूं शकलों मी ना कधीं अभागी !
मुखश्रीचें एकान्त दर्शनाचें
सुख स्वप्नांतहि तें न मिळायाचें ! ४

भाग्य नसतां मज रसिकरंजनाचें
कसे काढूं उद्गार धन्यतेचे ?
कुणा सांगूं या कर्मकहाणीला ?
—मला वाटे हा जन्म फुकट गेला ! ५

Bee

* Creative Power. † Art. § गाभारा.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावमीलन

आंब्यावरि कोकिळ
गीत बोले मंजुळ
वसंत-ऋतु-रागिणी
डोले नाग केतकी-वनीं ! १

वारा वाहे हळुवार
दरवळे महकार
फुले गुलाब बटमोगरा
दाटे गहिवर फुलपाखरा !

पान्हावली पुनव ही
सुधारस गळे महीं
पिउनिया बेहोष कण कण
वर-खाली सुख-सांडण ! ३

तुझ्या आवडीने राया !
डवरली माझी काया !
अंगिं अंगीं तुझिच प्रेमखूण
आता अवधि कशाला पण ? ४

आपणही एकमेक
गुंफुनिया गळां हात
एकतान करुनि नर्तन
बोलुं शुद्ध भावमीलन ! ५

गुणवंत हनुमंत देशपांडे.

तिकडेच सारें कांहीं !

तिकडेच सारें कांही आज येथें कांही नाही
तिकडेच आले ढग तिकडेच बरसात
तिकडेच सांज खुले आंत भरल्या रंगांत
वीज तिकडेच लवे लुकलुके वर तारा
साद पडसाद तेंथ तिकडचा येई वारा
घेई ओढ तिकडची धडधडून हृदय
घरट्यांतून डोळयाच्या दृष्टी उडूनिया जाय
इकडे मी आहें-नाही तिकडेच सारें कांही !!

आत्माराम रावजी देशपांडे
(अनिल)

नवें-जुनें

परंपरागत तेंच जुनें जग !
त्याच जगांतुन निघे नवें युग !!

काल बरसलें पाउसपाणी
आज उडालें वाफ होउनी
तरंगतांना दिसतिल गगनीं—
उद्या तयाचे गडद निळे ढग !

पेरायाला जुने पुराणे
जपुन ठेवले होते दाणे
आता त्यांतुन नवीन धान्यें—
उगवतील भरघोस लगोलग !

आजे गेले, पणजे गेले,
आज वडिल ते जातिल कालें
नातू, पणतू येतील मुलें
जुनी जाय तर नवी पिढी मग !

रूढ जाहली रूढी मागे
तीच नकोशी झाली आगें
सुधारणा जी करणें लागे—
तीच पुढे हो रूढी दुर्भग !

नवें-जुनें हा वाद वाउगा
नवें जुन्याची घेई जागा
उभयीं आहे अखंड धागा
जुनें-नवें हा क्रम चिर अविलग !

भवानीशंकर श्री. पंडित.

उन्हांत तांबूस

उन्हांत	तांबूस
पडतो	पाऊस
थेंब हा	एकेक
वाटतो	मौक्तिक
गुलाबी	ज्यांवर
अतर्क्य	लहर;

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आकाशीं अनेक
शिंपले सुरेख
रवीचे किरण
काय ते भंगून
वैभव अद्भुत
खालती ओतीत !
गगन– कमल
सुरक्त उत्फुल्ल
ढाळितें दवाचे
थेंब वा वरचे
जयांचा वर्षाव
मांडीत तांडव
अतीव मोहक
सौंदर्य– प्रतीक !
दवाच्या मोत्यांच्या
असोत कशाच्या
दाविती सरी या
रंगांची किमया
दाखवी आकाशीं
भास्कर ती जशी !

उन्हांत तांबूस
उघडे पाऊस
पडदा जादूचा
रंगीत मण्यांचा
उठवी लहरी
पवन ज्यावरी
पाहतां पाहतां
अदृश्य हो आता !
कितीक ठिकाणीं
साचलें हें पाणी
जयाच्या अंतरीं
आभाळ केशरी
जयांत तरंग
उठती सरंग,
डुलतें प्रत्येक
सुमन नाजूक
जांभळें, पिवळें,
तांबूस वा निळें !!

गुलाबी उन्हांत
सदनें नटत
गुलाबी उन्हांत
बालकें पथांत
गुलाबी उन्हांत
अप्सरा सस्मित !!

द. चिं. सोमण

चल चल सजणी !

अशि का बसुनी ? चलचल सजणी !

तणसर वावर निंदिसि कुठवर ?
गेल्या निघुनी बव सोबतिणी !
सरिवर ये सर भिजले डोंगर !
न्हाली धरणी कोनोकोनीं !
थंडा वारा चिंब शरीरा
झडपे वरुनी उघड्या रानीं !
उठतां वर ढग चिमण्या लगबग
बसल्या दडुनी लपल्या हरिणी !

दिवस बुडाला कलति घराला
गाई चरुनी हिरव्या कुरणीं !
समोर नाला पहा ! डहुळला
वर उसळोनी चढतें पाणी !
घरिं निजलेलें भुकें ग छकुलें !
रडेल उठुनी भिरभिर बघुनी !
पडतां झाकट घरधनि तापट !
मनिं खवळोनी बसतिल रुसुनी !
दूर गडे ! घर जवळ गाव कर !
कुठे न कोणी ! आपण तरुणी ! —

पांडुरंग श्रावण गोरे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीनिवास नारायण बनहट्टी

वामन नारायण देशपांडे

विदर्भ-साहित्य-संघाचे विद्यमान अध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या वाङ्मयविषयक व संस्थाविषयक कामगिरीचा त्रोटक परिचय या लेखांत करून देण्यांत आला आहे. खुद्द बनहट्टी यांनी 'वृत्ति, कृति आणि अनुभूति' नांवाचा आत्मवृत्तपर लेख खास 'युगवाणी'-साठीं लिहिला आहे. तो तिसऱ्या अंकांत प्रसिद्ध होईल.

कांही वर्षांपूर्वीची गोष्ट. एका पुणेकर विद्वानाशीं बोलत असतां त्याने सहज विचारलें, "काय हो, तुमच्या वऱ्हाड-मध्यप्रांतांत अष्टपैलु मराठी लेखक कोण आहे?"

मीं चट्कन उत्तर दिलें, "प्राध्यापक बनहट्टी!"

बनहट्टींसंबंधींचें माझें हें मत अजूनहि कायम आहे. त्यांच्यासारखा निरनिराळ्या विषयांत—नव्हे, कांहीशा परस्परविरोधी अशाहि विषयांत--रंगणारा विद्वान् दुसरा क्वचित् असेल. वऱ्हाड-मध्यप्रांतांत एकेका विषयांत प्रवीण असे कांही मराठी लेखक आहेतः कुणी प्राचीन इतिहासांत, तर कुणी भारतीय तत्त्वज्ञानांत पारंगत आहेत. कुणी महानुभाव वाङ्मयाचे व्यासंगी, तर कुणी आधुनिक कवितेचे अभ्यासक आहेत. प्राध्यापक बनहट्टी मात्र भिन्नभिन्न विषयांत सारख्याच लीलेने संचार करूं शकतात. ज्या आत्मीयतेने ते भाषाशास्त्रादि रूक्ष विषयांचा अभ्यास करतील, त्याच आत्मीयतेने ते काव्यनाटकांतहि रंगून जातील. एरवीं बोलण्याचालण्यांत नीरस वाटणारे बनहट्टी अंतर्यामीं रसिक आहेत, याचें कुणास आश्चर्य वाटणार नाही? बनहट्टी हे नाट्यविषयाचे अधिकारी तज्ज्ञ आहेत, हें पुष्कळांस ठाऊक नसेल.

बाकी बनहट्टी यांच्या चौफेर व्यासंगाचें नवल करावयास नको. तीव्र बुद्धिमत्ता व विविध विषयांची गोडी या गोष्टी त्यांच्यांत परंपरेनेच उतरल्या आहेत, असेंहि म्हणतां येईल. त्यांचे वडील रा. नारायण दासो बनहट्टी हे स्वतः अष्टपैलु विद्वान् आहेत. त्यांची प्रज्ञा व्याकरणशास्त्रांत सखोल अवगाहन करते, तशीच ती संगीतांतहि रममाण होते! हाच अष्टपैलुपणा श्रीनिवासरावांतहि उतरला आहे. वडिलांचा संगीताचा व्यासंग मात्र त्यांच्यांत आला नाहीं, एवढाच काय तो फरक. पण त्यांच्यांत रसिकता पुरेपूर वास करते व तिच्या द्वारां त्यांनी स्वतःमधील संगीताच्या व्यासंगाभावाची उणीव अंशतः दूर केली आहे, असें म्हणतां येईल.

प्राध्यापक बनहट्टी यांच्या तीव्र बुद्धिमत्तेबद्दल बोलावयासच नको. शालेय व विद्यालयीन शिक्षणांत त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चमक चांगलीच दाखविली. ते थोड्या वयांत सन्मानपूर्वक एम्. ए., एल्एल् बी. झाले. 'मयूरकाव्यविवेचन' हें त्यांचें पहिलें पुस्तक अगदीच तरुण वयांत लिहिलें गेलें. १९२६-२७ या कालांत ते मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक होते; आणि १९२७ पासून ते वऱ्हाड-मध्यप्रांतांत आले व इकडचेच रहिवासी झाले. १९२७ ते १९४४ या अवधींत नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत व १९४४ ते नोव्हेंबर १९४५ या अवधींत उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजांत ते मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. प्राध्यापक या नात्याने त्यांनी केलेली कामगिरीहि त्यांच्या बुद्धिमत्तेची द्योतक आहे. अगदी पहिल्या वर्षापासून त्यांनी पी. एच्. डी. पर्यंतच्या विद्यार्थ्यांस शिकविलें आहे, हें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. दुर्दैवाने त्यांच्यांत वक्तृत्व नसल्यामुळे ते सर्वसामान्य विद्यार्थ्यांत लोकप्रिय झाले नाहीत. परंतु अभ्यासी विद्यार्थ्यांस त्यांच्या अध्यापनापासून अपरिमित लाभ झाला आहे, हें नाकारतां येत नाही. वऱ्हाडमध्यप्रांतांतील लेखकांची तरुण पिढी प्रायः बनहट्टींच्याच हाताखाली तयार झाली, एवढें म्हटलें, म्हणजे त्यांच्या मूलग्राही शिक्षणपद्धतीबद्दल निराळें लिहावयास नको.

शैक्षणिक क्षेत्रांत प्राध्यापक बनहट्टी यांनी जबाबदारीचीं पुष्कळ कामें केलीं आहेतः मुंबई, नागपुर,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आग्रा, बनारस इत्यादि विद्यापीठांत थेट पी. एच. डी.-च्या परीक्षेपर्यंत परीक्षक या नात्याने त्यांनी वेळोवेळीं काम केलें आहे. नागपुर विद्यापीठाच्या 'फॅकल्टी ऑफ् आर्ट्स्'चे ते सभासद असून मराठी विभागाचे १९३९ तें १९४२ पर्यंत प्रमुखहि होते.

प्राध्यापक वनहट्टी यांनी विपुल लेखन केलेलें नसलें, तथापि त्यांनी जें काय लेखन केलें आहे, तें वेचक आहे. त्यांच्या 'मयूरकाव्यविवेचन' या ग्रंथाचा उल्लेख वर आलाच आहे. त्याव्यतिरिक्त त्यांनी 'ज्ञानोपासना व भारतीयांचें कर्तव्य' आणि 'चिपळूणकर द्विविध दर्शन-उत्तरार्ध' हे दोन ग्रंथ लिहिले आहेत. 'एकावळी' पुस्तकांत त्यांचे कांही लेख संगृहीत करण्यांत आले आहेत.

याखेरीज त्यांनी फुटकळ लेखन बरेंच केलेलें आहे: विवेचनात्मक, संशोधनात्मक, समाजजीवन-विषयक असें विविध स्वरूपाचें त्यांचें लेखन आहे. १९३५ सालच्या इंदूर-साहित्य-संमेलन-प्रसंगीं साहित्य-शाखेच्या अध्यक्षपदावरून वनहट्टी यांनी जें भाषण केलें, तें त्यांच्या फुटकळ लेखनांत सर्वोत्कृष्ट ठरतें. हें भाषण व त्यांचे उर्वरित निवडक लेख यांचा संग्रह निघाल्यास मराठींत एका उत्तम निबंधसंग्रहाची भर पडेल.

अलीकडे वनहट्टी इतिहास-संशोधनाकडे वळले आहेत, असें दिसतें. 'इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स् कमिशन' व 'इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस' या दोन संस्थांच्या अधिवेशनांस ते एकत्र्यांत अनेकदा उपस्थित झाले होते. आणि, त्यांत त्यांनी कैक शोधनिबंधहि वाचले. अलीकडे त्यांनी नागपुरकर भोंसल्यांच्या दरबारीं असलेल्या इंग्रज रेसि-डेंटांच्या पत्रव्यवहाराचा अभ्यास सुरू केलेला असून त्यावाबत त्यांनी कित्येक शोधनिबंध लिहिले आहेत.

वनहट्टींचें सारेंच लेखन मोठें भारदस्त व संयम-पूर्ण असतें. आधाराशिवाय ते कोणतेंहि विधान करणार नाहीत. त्यांचा दृष्टिकोन नेहमी व्यापक असाच असतो. त्यांच्या भाषाप्रभुत्वाबद्दल तर लिहावयासच नको. विदर्भ-साहित्य-संघाच्या दर्यापुरच्या नवव्या अधिवेशनांत अध्यक्षपदावरून त्यांनी जें भाषण केलें, त्यांतील भाषेचा सकसपणा मला मोठा विलोभनीय वाटला. वनहट्टींचें लेखन कांहींसें पाल्हाळिक असतें, एवढेंच त्यांतील वैगुण्य मला दाखवावेंसें वाटतें. त्यांची लेखन-पद्धति निरलंकृत असूनहि कंटाळवाणी वाटत नाही, हें तिचें वैशिष्ट्य उल्लेखनीय आहे.

प्राध्यापक वनहट्टी यांचें कार्यकर्तृत्व फक्त लेखना-पुरतेंच मर्यादित आहे, असें नाही. अनेक संस्थांचा व्याप आपल्या मागे लावून घेणें हा एक त्यांचा स्वभावविशेष आहे, आणि ही त्यांची संस्थाविषयक कामगिरी, एका अर्थी, त्यांच्या लेखनापेक्षाहि महत्त्वाची आहे.

वनहट्टींनी 'नवभारत ग्रंथमाला' नामक वाङ्मय-प्रकाशन-संस्था काढून आतापर्यंत एकूणवीस पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. हीं सर्वच पुस्तकें कमीजास्त प्रमाणांत ज्ञानप्रद व विचारप्रवर्तक आहेत. अशी माला मराठींतच काय, परंतु इतर भारतीय भाषांतहि नसेल, असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. 'नव-भारत ग्रंथमाले'चे संपादक या नात्याने वनहट्टींचें नांव मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत कायमचें नमूद केलें जाईल, याबद्दल मला शंका नाही.

ज्या विदर्भ-साहित्य-संघातर्फे प्रस्तुत 'युगवाणी' मासिक निघत आहे, त्याचे १९३७ पासून वनहट्टी हे उपाध्यक्ष आहेत. मध्यंतरी संघाच्या कार्यास खीळ पडून तो नामशेष झाल्यासारखा वाटत होता. म्हणून १९४४ सालीं वनहट्टींनी डॉ. य. खु. देशपांडे, रा.ना.कृ. दिवाणजी प्रभृतींच्या सहकार्याने संघाच्या पुनर्घटनेचें काम हातीं घेऊन तें तडीस नेलें. आणि, १९४५ च्या ईस्टरमध्ये अकोट येथे संघाचें अधिवेशन भरवून संघाच्या कार्यास चालना दिली. डिसेंबर १९४५ मध्ये दर्यापुर येथे संघाचें जें नववें अधिवेशन झालें, त्याचे वनहट्टीच अध्यक्ष होते. संघाचें मासिक काढण्याची कल्पना वनहट्टींची असून तिला मूर्त स्वरूप देण्याचें श्रेयहि प्रामुख्याने त्यांजकडेच जातें.

इतरहि किती तरी संस्थांशीं वनहट्टींचा संबंध आलेला आहे. अशा कांही संस्थांचा संबंधेतील नांवाप्रमाणे येथे नुसता उल्लेख करतो: १९३९ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र-नाट्य-संमेलनाचे वनहट्टी कार्याध्यक्ष आहेत. नागपुर येथील 'अभिनव-नाट्य-मंदिरा'चे ते १९३४ ते १९४४ पर्यंत अध्यक्ष होते. ही संस्था पुढे 'अॅकॅडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट' नामक व्यापक संस्थेंत सामील करण्यांत आली. याहि संस्थेचे वनहट्टीच मुख्य कार्य-वाह आहेत. मध्यंतरीं 'भारतीय साहित्य-परिषदे'च्या महाराष्ट्र शाखेचे संयोजक या नात्याने त्यांनी दोन वर्षें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'विहंगम' मासिक चालविलें. महाराष्ट्र-साहित्य-संमेलन विरुद्ध महाराष्ट्र-साहित्य-परिषद् या वादांत बनहट्टींनी प्रामुख्याने भाग घेतला होता. त्यावेळीं बनहट्टींनी पुरस्कारलेल्या तत्त्वांपैकी बरींच तत्त्वें इतका काळ लोटल्यानंतर परिषदेला मान्य होऊन त्याप्रमाणे परिषदेच्या घटनेंत, अर्धवट का होईना, बदल करण्यांत आला आहे.

बनहट्टींच्या रंगभूमिविषयक कामगिरीचा स्वतंत्रच परामर्ष घेतला पाहिजेः बनहट्टी हे नाट्य-विषयाचे तज्ज्ञ असल्याचा उल्लेख वर आलाच आहे. नाट्य-विषयाच्या या प्रेमामुळेच ते रंगभूमीला ऊर्जितावस्था आणण्याच्या कार्याकडे वळले. त्यांच्या एतद्विषयक कामगिरीचा येथे फक्त त्रोटक निर्देश तेवढाच करतां येईलः महाराष्ट्र-नाट्य-संमेलनाचे कार्याध्यक्ष या नात्याने रंगभूमिविषयक कार्याला अखिल महाराष्ट्रांत चालना देण्याची बनहट्टींनी खटपट केली. महाराष्ट्र-रंगभूमीचा शत-सांवत्सरिक-उत्सव १९४३ मध्ये साजरा करण्याच्या कल्पनेचे प्रवर्तक व ती अमलांत आणण्याचा प्रयत्न करणारे योजक बनहट्टीच होत. डिसेंबर १९४१-मध्ये मुंबई येथील नाट्यसंमेलनांत 'अखिल महाराष्ट्रीय रंगभूमि-शत-सांवत्सरिक-उत्सव-मंडळ' स्थापन करण्यांत आलें. त्याचे संयोजक व कार्याध्यक्ष म्हणून बनहट्टींचीच योजना झाली. महाराष्ट्रांत सर्वत्र रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा व्हावा यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम केले. १९४३ च्या अखेरीपासून १९४५ च्या प्रारंभापर्यंत महाराष्ट्रांतील मोटमोठ्या शहरींच नव्हे, तर लहानलहान आडवळणाच्या गावींहि शतसांवत्सरिक उत्सव जे साजरे झाले, त्यांच्या प्रेरणेचें श्रेय बनहट्टींकडेच जातें, असें अतिशयोक्ति न करतां म्हणतां येईल. सदर उत्सवाच्या निमित्ताने वाङ्मयनिर्मितीची अतिशय महत्त्वाची योजना त्यांनी आखली व तो उत्सवमंडळाकडून मान्य करून घेतली. या योजनेपैकी (अ) 'महाराष्ट्र-रंगभूमीचा सांगोपांग व सोपपत्तिक इतिहास' व (आ) 'महाराष्ट्र-नाट्यकोश' या ग्रंथांचें काम बनहट्टींच्या प्रयत्नाने चालू झालें आहे. पहिल्या ग्रंथाचे मुख्य संपादक व अर्ध्या भागाचे लेखक म्हणून त्यांचेंच नांव उत्सवमंडळाने मुकर केलें आहे. या ग्रंथाची तयारी सध्या चालू आहे. याखेरीज, नागपुर विद्यापीठांत नाट्य-कलेच्या अभ्यासास प्रवेश मिळावा, म्हणून त्यांनी खटपट चालविली असून तिला यश येण्याचा संभव वाटूं लागला आहे.

याप्रमाणे रंगभूमीला ऊर्जित दशा आणण्याबाबत बनहट्टींनी पुष्कळच प्रयत्न केलेले आहेत. रंगभूमीच्या इतिहासकारास त्यांच्या प्रयत्नांची दाद घेणें अपरिहार्य आहे.

प्राध्यापक बनहट्टी यांचीं हीं विविध कार्यें पाहिलीं, म्हणजे त्यांच्यांत कामाचा उरक केवढा आहे, याचा अंदाज होतो. नोव्हेंबर १९४५ पासून बनहट्टी सेवा-निवृत्त झाले आहेत. यामुळे इतःपर ते आपलीं आवडतीं वाङ्मयविषयक व संस्थाविषयक कार्यें करण्यास मोकळे झाले आहेत, असें म्हणतां येतें. बनहट्टींकडून यापूर्वी चांगल्यापैकी लेखन झालेलें असलें, तरी पण वाङ्मयक्षेत्रांत त्यांच्या संबंधी माझ्यासारख्याच्या याहून जास्त अपेक्षा आहेत. मराठी वाङ्मयाला भूषण-भूत होतील असे पहिल्या प्रतीचे ग्रंथ त्यांच्या हातून लिहिले जावेत, असें माझ्यासारख्या त्यांच्या मित्रांस फार वाटतें. त्यांच्यांत हें सामर्थ्य आहे, याविषयीं कुणासच संशय नाही. त्याचप्रमाणे, विदर्भ-साहित्य-संघ व इतर संस्था यांना त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा दीर्घकाल लाभ होत गेला पाहिजे. बनहट्टींसारखे चिकाटीचे साक्षेपी कार्यकर्ते खरोखरच विरळा.

शेवटीं बनहट्टींचे मित्र रा. काकासाहेब कालेलकर यांचा त्यांच्याबद्दलचा अभिप्राय उद्धृत करून हा चिमुकला परिचय-लेख पुरा करतांः--

"...त्यांची विद्वत्ता, नम्रता आणि निरलस साक्षेप पाहून मला त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला. सरकारी नोकरी सांभाळून साहित्याची आणि समाजाची त्यांनी जी सेवा आजवर चालविली आहे, ती खरोखर स्पृहणीय आहे. सार्वजनिक कामांत काय, आणि सरकारी नोकरींत काय, टक्केटोणपे हे खावे लागतातच. पण त्यांतहि फरक आहे. सार्वजनिक टक्क्या-टोणप्यांनी मनुष्याचें तेज वाढतें. सरकारी खात्यांतील वातावरणाने मनुष्य जेरीस येतो, कारण तेथे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो. बनहट्टी आजारी पडले व त्यांना 'पेन्शन' घेणें भाग पडलें.

"मी आशा करतों की, सासुरवासांतून मुक्त झालेल्या बनहट्टींची प्रकृति सुधारेल, इतकेंच नव्हे, तर त्यांची साहित्यिक समाजसेवा विशेष उज्ज्वल आणि तेजस्वी होईल."

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नवनिर्मिति आणि टीकाखोर वृत्ति

काकासाहेब कालेलकर

रा. काकासाहेब कालेलकर यांचा साहित्यक्षेत्रांत केवढा थोर दर्जा आहे, हें आता कुणास नव्याने सांगावयास नको. काकासाहेबांनी या लेखांत महाराष्ट्राच्या 'टीकाखोर वृत्ती'वर विदारक प्रकाश पाडला आहे. टीका जीवननिष्ठ नसल्यास ती नवनिर्मितीस प्रतिबंधक होते, हा काकासाहेबांचा मुद्दा विचारणीय नाही, असें कोण म्हणेल ?

माझे एक मित्र एकदा मला म्हणाले, "कांहो, तुमच्या महाराष्ट्रांत नेहमी कांही ना कांही वाद चालत असतात, नाही का ?" मीं उत्तर केलें, "हो, एक वाद चालूं लागला, म्हणजे चालूंच लागतो. दुसरा एखादा वाद उपस्थित झाला, तरच पहिला वाद थंड पडायचा." माझे मित्र म्हणाले, "तें असो, पण अगदी कडूजहर व्यक्तिगत टीकेपर्यंत तुमच्या तिकडचे वाद का जात असतात ? उखाळ्यापाखाळ्या काढल्यावाचून वादाला रंगच येत नाही का ?"

मला या प्रश्नाचें वाईट वाटलें. त्यांचें म्हणणें पुष्कळ अंशीं खरें होतें. लहानपणीं कोटल्याशा मासिकांत वाचलेल्या कवितेची एक ओळ मनांत आली—'कोणी म्हणती रागरागिण्या कोणी म्हणती गज्जल्। सरतेशेवटिं येउनि ठेपलि लावणीवरी मजल्॥'

आपल्या येथें असें कां होतें ? सार्वजनिक कामांत पडलेले लोक सगळेच सज्जन असतात. मतभेद हे असावयाचेच. वादविवाद आणि चर्चा केल्यावाचून तत्त्वाची छाननी तरी व्हावी कशी ? लोकांनी आपला अनुभव जनतेपुढे मांडावा. श्रेष्ठ जीवनतत्त्वावर निरनिराळीं धोरणें कसून पाहावीं. समंजस तर्क लढवावा. आणि, आपलें म्हणणें विशद झालें म्हणजे विरजण जसें बाजूला ठेवून देतों, तसा वाद निकालांत काढावा. वाद हा आपली बाजू स्पष्ट मांडीतोंपर्यंत आणि दुसऱ्याची बाजू स्पष्ट होईतोंपर्यंतच चालवावयाचा असतो. वाद चालू असतांना कोणाचेंहि मतपरिवर्तन होण्याची अपेक्षा बाळगूं नये. मतपरिवर्तन वाद आटोपल्यानंतर एकांतांत चिंतन करीत असतांना होत असतें, किंवा अनुभवाने होत असतें. चित्तवृत्ति अनुकूल झाली, प्रतिनिविष्टता दूर झाली, म्हणजेच मनुष्य प्रतिपक्षाच्या म्हणण्याचा विचार करूं लागतो. त्याला तसा अवकाश देण्यासाठी त्याच्या सज्जनतेची वृद्धि होईल, असें वातावरण निर्माण करण्याची आपली जबाबदारी असते. प्रतिपक्षाचा पिच्छा पुरवून त्याला परास्त करणें आणि समाजांत त्याचें स्थानच उरूं न देणें हा कांही खरा विजय नव्हे. खरा विजय प्रतिपक्षाच्या चांगुलपणाची जोपासना करून त्याला आपलें म्हणणें सामोपचाराने समजून घ्यावयाला लावणें आणि अशा रीतीने त्याला आपलें म्हणणें पटवून देणें आणि त्याच्या म्हणण्यांत जो कांही ग्राह्यांश असेल, त्याचा स्वीकार करून त्याला आपल्याजवळ आणणें, यांतच असतो.

परवा बडोद्याच्या मराठी वाङ्मय-परिषदेच्या शेवटीं उपसंहारादाखल बोलतांना वादासाठी म्हणून एक विषय परिषदेपुढे मीं मांडला. माझें म्हणणें मीं थोडें विषद करावें, अशी सभासदांनी मागणी केली. त्यावेळीं जें बोललों, तेंच थोड्याशा विस्ताराने येथे लिहीत आहें.

सामान्यपणें साहित्याचे दोन विभाग पडतात: सर्जनात्मक साहित्य आणि विवेचनात्मक साहित्य. एकांत नवनिर्मिति असते, दुसऱ्यांत एखाद्या निर्मितीविषयींचा अभिप्राय तयार करणारी टीका असते. केव्हा केव्हा अनेक निर्मितींच्या प्रवाहाविषयीं आणि वळणाविषयीं सर्वसामान्य टीकाहि त्यांत येऊं शकते.

नवनिर्मितीचें साहित्य हेंच साहित्याचें प्रधान अंग आहे, यांत शंका नाही. पण टीकात्मक साहित्य कमी महत्त्वाचें नसतें. लोकांची अभिरुचि हीन किंवा कृत्रिम होऊं नये, साहित्यनिर्मितींत बाष्कळपणा, उथळपणा किंवा कुजकेपणा येऊं नये, यासाठी टीकाकारांनी जागरूकपणें साहित्यावर देखरेख ठेवणें अवश्य असतें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानोपासना शिथिल, जटिल किंवा निःसार न व्हावी, समाजाला हीन प्रेरणा न मिळावी, सामाजिक आदर्श विकृत न व्हावेत, लोकमानसाचा अधःपात न व्हावा, यासाठी विवेचनात्मक साहित्याने सर्व प्रकारच्या साहित्यनिर्मितीचा समाचार घेणें अवश्य असतें. कुशल माळ्याने झाडाझुडपांची काटछाट केली, म्हणजे जशीं तीं जोमदार होतात, त्याचप्रमाणे विवेचक साहित्य जागरूक असलें म्हणजे साहित्याची जोमाने वाढ होते.

साहित्यनिर्माण आणि साहित्यपरीक्षण या दोन्ही गोष्टी एकाच मनुष्याला करणें अशक्य नसतें. कांही उत्कृष्ट कवि तितकेच विवेचकहि असलेले आढळून येतात. पण साधारणपणे अनुभव असा आहे की, सर्जनात्मक शक्ति असलेला लेखक विवेचनाच्या भानगडींत पडत नाही. आणि, विवेचनपटु लेखक नवनिर्मितीविषयीं अनुत्साही किंवा अन्-आत्मविश्वासी दिसून येतो. दुसऱ्याच्या कृतींतील दोष दाखविणाऱ्याची स्वतःची कृति जर निर्दोष नसेल, तर लोक त्याच्यावर तुटून पडणारच. तेव्हा वशा संकटांत सापडण्यापेक्षा परीक्षण आणि दोषाविष्करण करीतच कां बसूं नये, असा विचार एखाद्याने जर केला, तर त्यांत कांही आश्चर्य नाही. एक इराणी म्हण आहे, 'करणाऱ्याच्या कृतींत शेकडो दोष सापडतील, न करणाऱ्याचा एकच दोष की, त्याने कांही केलेंच नाही!'

जे लोक अति वाचन करतात आणि समाजसेवेचें प्रत्यक्ष काम हातीं घेत नाहीत, त्यांना वाचनापुढे आणि चर्चेपुढे पुष्कळदा नवनिर्मिति करण्याचें सुचतच नाही. अतिवाचनाचें व्यसन जडलें, म्हणजे केव्हा केव्हा त्या वाचनाला वंध्यत्व येतें आणि त्यांतून जी चर्चा निर्माण होते, ती पुष्कळदा निरर्थक किंवा वितंडात्मकहि होते. वाचन काय, चर्चा काय किंवा साहित्यनिर्मिति काय, या तिन्हींचा अनुबन्ध जीवनाशीं असला, तरच त्यांत जिवंतपणा येतो. नाहीतर सर्वच कृत्रिम आणि अनस्वार्थ होतें.

आता, प्रश्न असा आहे की, टीकाकारवृत्ति प्रमाणाबाहेर वाढली आणि जीवनाचा अनुबंध तुटला, तर साहित्यांत महत्त्वाची नवनिर्मिति होऊं शकेल काय? कांही लोकांचें म्हणणें आहे की, टीकाप्रवृत्ति वाढली म्हणजे निर्मितिक्षमता कमी होतेच. दुसरे लोक म्हणतात की, व्यक्तीच्या बाबतींत हें कदाचित खरें असेल, समाजाच्या बाबतींत असें होणें आवश्यक नाही. टीका करणारे टीका करतील; ज्यांना निर्मिति करावयाची आहे, त्यांचा हात टीकाकार थोडेच धरूं शकतात? ग्रीक वाङ्मयाच्या अभ्युदयाच्या काळीं कडवे टीकाकार थोडेथोडके नव्हते.

समाजहिताचा विचार करणारे लोक म्हणतात की, दोन्ही बाजूंचें म्हणणें जमेस धरूनच आम्हांला सांगावेंसें वाटतें की, समाजांत टीकाखोर वृत्ति वाढली म्हणजे साहित्यनिर्मितीचा उत्साह मंद तरी होतो, किंवा विकृत रूप तरी धारण करतो. लहान मुलांना घरची आणि बाहेरची मंडळी पावलोपावलीं हिडिसफिडिस करूं लागली, तर ज्याप्रमाणे तीं अंग धरीत नाहीत, त्याचप्रमाणे साहित्यनिर्मितीचेंहि आहे. टीकाकारांची टीका ध्यानांत धरून जर एखाद्याने अत्यंत निर्दोष अशी साहित्यकृति निर्माण केली, तर ती सगुण असेलच, असें सांगतां यावयाचें नाही. प्रतिभेची चमक तर तिच्यांत दिसावयाचीच नाही. नवनिर्मिति हा कांही तारेवरचा खेळ नव्हे. तो जीवनसमृद्धीचा विलास असला पाहिजे.

ही झाली एक गोष्ट. दुसरी गोष्ट अशी की, टीकाखोरपणा वाढला म्हणजे आदर्शाविषयींची कल्पना देखील विकृत होऊन जाते. चांगलें काय आणि वाईट काय, याचा भेदच कळेनासा होतो, आणि सामाजिक जीवनाचा मुख्य आधार जी सहानुभूति तीच भराभर आटूं लागते. जेथें सहानुभूति नाही, तेथें सहकाराचें वातावरण उत्पन्न होणें शक्य नाही. मनुष्य टीका करावयास प्रवृत्त होतो, आदर्शाची उंची संभाळण्याच्या पवित्र हेतूने, पण सहानुभूतीच्या अभावीं टीकेची परिणति एकमेकांचे पाय ओढून त्यांना तोंडघशीं पाडण्याच्या इच्छेंतच होते. समाजहिताच्या कळकळींत उदारतेचें आणि बंधुतेचें तत्त्व जर नसलें, तर समाजसेवा कधी साधावयाची नाही.

एथवर आपण फक्त साहित्यनिर्मितीचाच विचार केला. आता, आपण सामाजिक जीवनाचा थोडासा विचार करूं.

समाजसेवक आणि समाजसुधारक नेहमी आदर्शांचा विचार करतात, त्याची चर्चा करतात आणि तो स्वतःच्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न करतात. आता, समाजांतील सामान्य लोक जर अशा सेवक-सुधारकांची निराळी जात पाडून म्हणूं लागतील कीं, "बाबांनो, तुम्ही साधुपुरुष आहांत, तुमचा आदर्श तुम्हांला लखलाभ होवो. आम्ही प्राकृत माणसें आहों, आम्ही स्वतःपुढे कसलाच आदर्श ठेवला नसल्यामुळे आम्हांला कोणी नांवें ठेवण्याचें कारण नाही. तुम्ही

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आदर्शांच्या गोष्टी करतां, तेव्हा तुम्ही त्याप्रमाणे चालतां किंवा नाही हें पाहणें आमचें काम आहे. समाजांत दंभ पसरतां कामा नये. आम्ही तुमच्याच कसोटीवर तुम्हांला कसून पाहणार, चांगलेंच घासून पाहणार; जर तुम्ही हिणकस ठरलांत, तर जगापुढे तुम्हांला उघडें करणें हेंहि आमचें कर्तव्य ठरतें. तसें आम्ही न केलें, तर समाजाचें रक्षण कसें व्हावें ?"—तर अशा लोकांना तसें म्हणण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण हें काम अशा लोकांनी दोन तीन पिढ्या केल्यानंतर त्याचा आढावा घेणें प्राप्त होतें.

समाजाच्या या चौकीदारांनी आपलें काम मोठ्या हिरिरीने केलें आहे, यात शंका नाही. पण परिणाम काय दिसतो ? आपलें सार्वजनिक जीवन सुधारलें आहे, दंभ कमी झाला आहे, लोकांना सार्वजनिक टीकेचा वचक बसला आहे, असें वातावरण आपण पाहतों आहों काय ?

अनुभव सांगतो की, या चौकीदारींत तटस्थपणा नेहमीच दिसून येतो, असें नाही. येथेंहि पक्ष-प्रतिपक्ष चालतातच. स्वकीयांच्या चुका संभाळून घ्यावयाच्या; परकीयांच्या असलेल्याच काय, पण नसलेल्या देखील चुका उघडकीस आणावयाच्या, आणि अखंड टीका चालवावयाची ! असें जर होऊं लागलें, तर समाजाच्या हातांतील हें शेवटचें शस्त्र देखील बोथट झाल्यावाचून राहावयाचें नाही.

आपण एकच उदाहरण घेऊं : महाराष्ट्रांत समाजाची सेवा करणाऱ्या लोकांपैकीं अत्यंत सात्त्विक असे लोक म्हणजे राष्ट्रीय शाळेंतील शिक्षक. कोठेहि जा, राष्ट्रीय शिक्षकांची लोकांना मदत असते. जिथे मदत नसेल, तेथे कींव तरी असतेच. पण अशा शिक्षकांना समाजाने आजीविकेच्या बाबतींत कधी निःशंक केलें आहे काय ? तेजस्वी महाराष्ट्राला असहकारी राष्ट्रीय शिक्षणच मान्य आहे; पण राष्ट्रीय शाळेंत मात्र विद्यार्थी बेताचेच यावयाचे ! त्यांना शाळा चालविण्यासाठी पैसे मिळावयाचे, ते संस्था जगूंहि नये आणि मरूंहि नये, इतक्याच बेताचे मिळावयाचे. उलटपक्षीं, सरकारशीं सहकार करणाऱ्या सार्वजनिक संस्थांना आपण 'निमसरकारी' म्हणूं, 'सरकारजमा' म्हणूं, पण फंड त्यांनाच मिळतात. मुलेंहि तेथेंच अधिक जातात. सार्वजनिक कामासाठी जेव्हा नवीन नवीन माणसें घेतलीं जातात, तेव्हा—पगाराची गोष्ट जाऊं द्या—विश्वासाचीं आणि जबाबदारीचीं कामें सोपविण्याचा प्रश्न उत्पन्न झाला की, राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थी आणि सरकारमान्य शाळेंतील विद्यार्थी यांची स्थिति किंवा दशा कशी काय असते, हेंहि पाहण्याजोगें असतें. राष्ट्रीय शाळेंतील शिक्षकांना आपण अगदी तरवारीच्या धारेवर धरतां, त्यांनी आत्यंतिक त्याग कसा केला पाहिजे, याचीहि चर्चा करतां. एखादा समाजाच्या त्या कसोटीस उतरलाच, तर त्याला मिळणार काय की, "हो बुवा, हा मनुष्य कणखर आहे खरा ! पण व्यवहार त्याला समजत नाही." आणि, जर एखादा व्यवहारकुशल असला, तर त्याला लोक म्हणावयाचे, "कसला आला आहे ध्येयनिष्ठ ! आम्ही त्याला चांगलें ओळखून आहोंत. जसे आम्ही आहोंत, तसाच तो आहे. बाता मात्र करतो समाजसेवेच्या !"

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपण टीकाखोर अधिक झालों आहोंत आणि आपली टीका जीवननिष्ठ असावयास पाहिजे, तिच्याऐवजी ती तर्कनिष्ठ झाली आहे. आणि, त्यांतूनच वितंडाहि उत्पन्न होते. अन्यत्र समाजसेवा चालते, आपल्या प्रान्तांतहि चालते; आपल्या प्रान्तांत थोड्या खर्चांत चालणाऱ्या सार्वजनिक संस्था पुष्कळ आहेत. पण परिश्रम आणि फळ यांचें प्रमाण पाहतां, आपलें सार्वजनिक जीवन अधिक लाभदायक झालें आहे, असें सांगतां येईल काय ? जर तसें नसेल, तर पुन्हा म्हणावें लागतें की, टीका ही आवश्यक आहे, पण ती योग्य प्रमाणांत असावी, आणि जीवननिष्ठ असावी. आपलीं शस्त्रें शुद्ध असावींत आणि तीं समाजाला मानवतील, अशींहि असावींत. पण जर टीकाखोरपणा वाढला आणि सर्वत्र टीका चालूं लागली, तर मात्र कर्तबगारीला ओहोटी लागेल. समाजाने जर मंबाजींचें काम केलें, तर एखादा तुकाराम तावून सलाखून निघून सदेह स्वर्गाला जाईल कदाचित्. पण समाजसेवेची रास मात्र अगदीच क्षीण होईल.

तेव्हा साहित्यनिर्मितीच्या बाबतींत आणि समाजसेवेच्या बाबतींत कर्तबगारी आणि नवनिर्मिति यांच्या प्रमाणावरच समाजाची प्रगति अवलंबून असणार. त्यांना पोषक होईल इतक्या आणि अशाच टीकेला आपण उत्तेजन दिलें पाहिजे. तसें न झालें, तर सामाजिक जीवन क्षीण होऊं लागेल. आपल्या येथे अशी स्थिति आहे की नाही, याविषयीं निश्चित कांही सांगतां येत नाही. केव्हा केव्हा वाटतें की, आपल्याकडे टीकाखोरपणा वाढला आहे आणि तो कर्तबगारीला बाधक होत चालला आहे. लहान मुलांच्या शिक्षणांत देखील तीच गोष्ट दिसून येते.

ही गोष्ट जर खरी असेल, तर तिचा तपास झाला पाहिजे. या गोष्टीची चर्चा झाली पाहिजे. आपण नेहमी इतका ऊहापोह करतों, तर हाहि विषय चर्चेला कां घेऊं नये ? या दिशेने विचार केल्यास कांही तरी चांगलेंच पदरांत पडेल.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठशाहींतील ऐतिहासिक स्त्रियांचें कर्तृत्व

रावबहादूर गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., रियासतकार

'इतिहासमार्तंड' नानासाहेब सरदेसाई यांचें लेखन इतक्या वृद्धापकालींहि सुरू आहे, याचें कुणास आश्चर्य वाटणार नाही ? महाराष्ट्राच्या या सर्वश्रेष्ठ इतिहासकाराने ऐतिहासिक स्त्रियांची कर्तबगारी या लेखांत दिग्दर्शित केली आहे, ती खुद्द स्त्रियांप्रमाणे पुरुषांसहि उद्बोधक वाटेल, यांत शंका नाही.

नुकतेंच मला एका सद्गृहस्थांचें पत्र आलें, त्यांत त्यांनी विचारणा केली की, "पूर्वकालांत रजपूत, मराठा, ब्राम्हणी, मुसलमानी किंवा इतर पेशवेकालीन स्त्रियांचे व्यायाम काय होते, घोड्यावर बसणें, तरवार, भाला, खंजीर, बोथाटी इत्यादिकांत त्यांची प्रवीणता कशी असे, राजघराण्यांतील किंवा सरदारांच्या स्त्रियांना कोणते व्यायाम प्रिय होते, हें सांगणाऱ्या पांच-पंचवीस स्त्रियांची नांवनिशी आपण सुचविल्यास मी आपला अत्यंत आभारी होईन." हें पत्र आल्यावर मी थोडा विचार करून उत्तर लिहूं लागलों, तेव्हा पुष्कळच उपयुक्त नांवें दृष्टीपुढे सुचलीं, त्यांचे जीवनक्रम मनांत उभे राहिले, आणि मागील कालाची आठवण प्रस्तुत परिस्थितींत किती बुजून गेली आहे, हें लक्ष्यांत येऊन एक प्रकारचें विलक्षण आश्चर्य माझें मलाच वाटूं लागलें. अनेक नानाविध ऐतिहासिक स्त्रियांचीं चरित्रें माझ्या वाचनांत होतीं. त्यांची नांवनिशी केल्यावर मागील स्त्री-जीवनाशीं आज प्रचंड विरोध उत्पन्न झालेला आढळला, तोच मी आज वाचकांपुढे मांडण्याचें योजिलें आहे. आशा आहे की, माझ्याप्रमाणेच वाचकांसहि हा विरोध चमत्कृतिजनक वाटून पूर्वकालाचें संशोधन करण्याची जिज्ञासा त्यांना उत्पन्न होईल.

राष्ट्राचें स्वातंत्र्याचें समृद्ध जीवन संपलें की, पराधीनतेचे प्रचंड आघात त्यास कसे सहन करावे लागतात, ही गोष्ट आपल्या स्त्रीवर्गाच्या जीवनांत ठळकपणें नजरेस येते. मराठ्यांचें राज्य गेल्याबरोबर पूर्वीचे व्यवसाय एकदम नष्ट होऊन जनतेचा एकंदर आयुःक्रम पार बदलून गेला. स. १९४५ च्या मेअखेर हिटलरच्या जर्मनीचा जसा चहूंकडून एकदम कोंडमारा झाला, तसाच प्रकार स. १८१८ च्या मे महिन्यांत जवळ जवळ सवाशें वर्षांपूर्वी बाजीराव पेशव्याचा होऊन मराठ्यांचें राज्य इंग्रजांच्या कबजांत गेलें. पुण्यास एल्फिन्स्टन होता, त्याने लगेच वरिष्ठांस सूचना लिहून पाठविली की, मराठ्यांचें राज्य आतां आपल्या हातीं आलें खरें, पण मला मोठी धास्ती वाटते की, मराठ्यांच्या मोठमोठ्या फौजा आहेत, त्या निकामी होऊन आपणांवर उठतील; सबब त्यांस निर्वीर्य बनविण्याची मला एक योजना सुचते, ती अशी की, या फौजांच्या पुढाऱ्यांस सरकारांतून जमिनी द्याव्या. मी त्यांस सांगतों की, तुम्हांला ही भालेतलवारींची दगदग आता कशास पाहिजे ? हीं हत्यारें मोडून त्यांचे नांगराचे फाळ उत्कृष्ट बनतील ते तयार करा आणि शेती करून शांततेने सुखोपभोग घ्या कसे ! एल्फिन्स्टनने ही क्लृप्ती एकदम अमलांत आणली. तिचा परिणाम काय झाला, तो आज आपण पाहत आहों. स्वसंरक्षणाचा हक्क सर्वस्वीं गमावून आपण पोलिसाकडे धाव घेऊं लागलों. आश्चर्याची गोष्ट परवा वाचली, ती ही की, आज जागतिक युद्ध संपल्याबरोबर ज्या हिंदी फौजा रिकाम्या होणार, त्यांचे करायचें काय, ही विवंचना आजच्या सरकारास पडून त्यांनीहि पुनरपि एल्फिन्स्टनच्याच मार्गाचा अवलंब सुचविला आहे. इंग्रजांची राजनीति कशी अस्खलित अखंड चालते पहा. इटली, ग्रीस, ब्रम्हदेश इत्यादि देशांत हिंदी सैनिकांनी बहादुरी मिळविल्यावर पुनरपि त्यांच्या हातांत नांगरच येणार की काय, कोणी सांगावें !

स्वराज्याच्या काळांत आपल्या समाजाची स्थिति व तयारी इतकी भिन्न होती की, आजच्या आमच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेखण्यांना तें पूर्वीचें सामर्थ्य दर्शवितां येणार नाही. इतिहासांत आपण कांही थोडीं पुरुषांचीं नांवें तेवढीं वाचतों. स्त्रियांचीं नांवें विद्यार्थ्यांच्या कानांवरून गेलीं, तर तीं जिजाबाई, अहल्याबाई, राणी लक्ष्मीबाई अशा चार-चौघींचींच. फार झालें तर, पद्मिनी, रझियाबेगम, चांदबिबी वगैरे आणखी चार-दोन नांवें मिळविलीं की, संपला स्त्रियांचा भाग. मग खुशाल रामायण-महाभारताकडे जाऊन सीता, द्रौपदी, दमयंती, सावित्री यांचीं आख्यानें पाठ करून माना डोलवाव्या.

मराठ्यांच्या इतिहासांत स्त्रियांचा भाग केवढा होता, याची जाणीव माझ्या मतें फार थोड्यांस असेल. शाळेंत जाऊन साक्षरता पैदा करण्याचा तो काळ नव्हता. संसारांतले प्रत्यक्ष व्यवहार जबाबदारीनें उलगडण्याची ताकद पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि असत, तेव्हाच तें राष्ट्र जिवंत राहतें. संताजी घोरपडे बऱ्हाणपुरापासून जिंजी-पावेतों हजार मैलांच्या क्षेत्रांत चमकत राहून औरंग-जेबाच्या फौजेस आठ वर्षें पावेतों नमवूं शकला, त्या वेळीं त्याचे घरचे प्रपंच व जागिरीची व्यवस्था कोण सांभाळीत होतें, याचा विचार आपल्या मनांत येतो काय? तंजावर, जिंजी, श्रीरंगपट्टण, भागानगर, उज्जैन, झांशी, मकसुदाबाद, मथुरा, लाहोर, अटक-पावेतों मराठे सरदार व त्यांचे सैनिक सारखे शेंदोनशे वर्षें मुलुखगिरी करीत दौडत होते, तेंव्हा त्यांच्या वतनी गावांचा कारभार सर्व त्यांच्या बायका पाहत होत्या. पुरुष दहापंधरा वर्षांचा झाला की, तो वडिलांबरोबर बाहेर पडे. घरचा कारभार सर्व स्त्रियांच्या हातीं. प्रत्येकाच्या घरीं पांचपन्नास कारकून व शिपाईप्यादे बंदोबस्तास असत, त्यांजवर सर्व मालकी व देखरेख मुख्य मालकिणीची असे. वसूल वेळेवर करणें, जमा-खर्च ठेवणें, लांड्या-लबाड्या मिटविणें, लग्नकार्यांचे व सणावारांचे समारंभ उरकणें हीं कामें तर बायकांना करावीं लागतच, पण शिवाय बाहेर लढणाऱ्या पुरुषां-कडून मागणी येई त्याप्रमाणें नवीन रिक्रूट भरती करणें, त्यांची परीक्षा करून पगार ठरविणें, त्यांना घोडे सामान वगैरे पुरविणें, अशीं सर्व आनुषंगिक कामें बहुधा बायकाच करीत. लिहितां येत असो नसो, पण व्यवहार कांही अडत नसे. जिवंत राष्ट्राच्या स्त्रियांना हे व्यवहार उलगडल्याशिवाय भागलेंच नसतें. यावरून व्यावहारिक शहाणपण व प्रपंचचातुर्य स्त्री-वर्गाला त्या काळीं केवढें आलें असेल, याची कल्पना होईल.

पण याशिवाय दुसरा एक स्वसंरक्षणाचा प्रकार त्यावेळीं अत्यंत निकडीचा कसा होता, हें सहसा कोणाच्या लक्षांत येण्याजोगें नाही. तो काळ आजच्या सारख्या इंग्रजी शांततेचा नव्हता. चोऱ्या, दंगे, खून, मारामाऱ्या अशा धामधुमी सारख्या चालत. कोणतेंहि लग्नकार्य किंवा समारंभ निर्विघ्नपणें पार पडणें इतकें मुष्किलीचें होतें की, मानवी उपाय पुरे करूनहि यशाची खात्री नसे. म्हणून प्रत्येक लहान-मोठ्या कृत्याच्या आरंभीं विघ्नहर्त्या गजाननाची पूजा करण्याचा प्रघात सार्वत्रिक बनला. त्यांतून स्त्रियांना तर इतर प्रापंचिक दक्षतेपलीकडे स्वतःच्या अब्रूचा बचाव करणें हें एक अवघड जोखीमच होतें. केव्हा कोठे कसा प्रसंग येईल, याचा नेम नसे. प्रवास तर अत्यंत संकटमय होता. त्यासाठी प्रत्येक स्त्रीला घोड्यावर बसण्याची कला अवगत असावी लागे. अकस्मात् हल्ला आला, तर शत्रूचा पाडाव व स्वतःचा बचाव करण्यासाठी तरवार, बर्ची, भाले इत्यादि शस्त्रें बाळ-गून त्यांचा उपयोग करण्याचें सामर्थ्य स्त्रियांना असावें लागे. कांही तरी गुप्त हत्यार वेणींत वगैरे बाळगून किंवा निदान विष घेऊन प्राणत्याग करण्याची तयारी त्या ठेवीत.

होळकरांचा सरदार गंगाधर यशवंत चंद्रचूड आपल्या पुत्रांसह उत्तरेंत दिल्लीकडे कामगिरीवर असतां, दक्षिणेंत निजामानें पुणें, नासिक वगैरे शहरें जाळ-ल्याची बातमी त्यास कळली. त्यानें वाफगावास बायका होत्या त्यांस खबर विचारली की, तुमचा समा-चार कसा काय आहे. त्यावर त्या स्त्रियांनी बाणेदार उत्तर पाठविलें, त्यांत त्यांच्या दक्षतेचें उत्कृष्ट वर्णन आढळतें. त्यांनी कळविलें की, आपण सर्व तिकडे निश्चिन्त राहा. येथे आमचा बंदोबस्त पक्का आहे. मोल-वान् जिंदगी सर्व जागजागीं गुप्त ठेविली आहे. शत्रु आला, तर त्याच्या हातीं कांही लागूं नये, अशी तज-वीज केली आहे. तुम्ही ज्या कामगिरीवर आहां, ती उत्कृष्ट पार पाडा, म्हणजे आम्हांस सर्व पावलें. अशा बायका धीर देणाऱ्या राष्ट्रांत असतात, तेव्हाच राज्य चालतें.

युद्धकला, राजकारण, न्यायनिवाडे, लोकसंग्रह अशा राज्याच्या नानाविध अंगांत महाराष्ट्रीय स्त्रिया—किंबहुना पुष्कळशा हिंदी स्त्रिया—पुरुषांच्या बरोबरीनें आलेलीं कामें कशा उलगडीत होत्या, याचीं उदाहरणें वाटेल तितकीं देतां येतील. बाजीरावाचें प्रेमपात्र

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मस्तानी ही सुस्वरूप व नृत्यगायनादि कलांत निष्णात होती, हें आपण जाणतों. पण तिच्या अंगीं बाजीरावाला आवडणारे अश्वारोहण व शस्त्रकला हे गुणविशेष होते, म्हणूनच बाजीराव तिजवर इतका फिदा झाला. 'तारिखी महंमदशाही' या ग्रंथांत मस्तानीचें वर्णन दिलें आहे, तें असें, "ही कंचनी असून अश्वारोहणांत विशेष कुशल होती. बाजीरावाप्रमाणेंच ती तरवार-भाला वापरून त्याजबरोबर भरधाव दौड करी. तीं दोघें तीव्रवेगाने घोडदौड करीत, तेव्हा त्यांच्या रिकिबी यत्किंचित् मागे पुढे होत नसत. मोहिमांत ती बाजीरावाच्या बरोबरीने हजर असे." ("Mastani was a dancing girl possessing fine horsemanship and skill in handling the sword and the spear. She always accompanied Bajirao in his campaigns and rode stirrup to stirrup with him")

सुरजमल्ल जाटाचें नांव मराठी इतिहासांत गाजलेलें आहे. त्याची राणी किशोरी हिचा लौकिक त्यावेळीं सर्व देशभर गाजलेला होता. सदा हसतमुख असल्यामुळें तिला 'हसिया' + हें टोपणनांव पडलें होतें. तिनें केवळ स्वतःच्या अकलेने जाटराज्याचा लौकिक तर वाढविलाच, पण देशांतील अनेक बिकट राजकारणें परहितबुद्धीने सोडवून आपलें नांव अजरामर करून ठेविलें. स. १७५४ सालीं राघोबादादांनी जाटांच्या कुंभेरी किल्ल्यास वेढा घातला, त्या प्रसंगांत मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव (अहल्याबाईचा नवरा) मारला गेला, त्या शोकावेगांत मल्हाररावाने प्रतिज्ञा केली की, जाटांचें राज्य समूळ बुडविणार. सुरजमल्लावर मोठा पेच येऊन पडला. या पेचांतून राणी किशोरीनें जयाप्पा सिंद्यांशीं संधान बांधून संकट निवारण केलें. पुढे सात वर्षांनी पानिपतावर मराठ्यांचा संहार होऊन हजारों लोक जीव बचावून परत आले, त्यांस स्वखर्चानें अन्नवस्त्रादि साहित्य पुरवून राणी किशोरीने त्यांचा उत्कृष्ट परामर्श घेतला. या तिच्या शहाणपणाचें व औदार्याचें वर्णन मराठी कागदांत आढळतें. यावरून स्त्रियांच्या अंगीं त्यावेळीं केवढें कर्तृत्व होतें, याची कल्पना होईल.

+ भाऊसाहेबांच्या बखरींत हणसया नांव दिलें आहे, हें 'हसिया'चेंच अवतरण नकलकाराने केलेलें होय.

पेशव्यांच्या घराण्यांत अनेक नामांकित स्त्रिया निपजल्या. त्यांचीं चरित्रें वाचकांस थोडींबहुत परिचित असल्यामुळे त्यांचा निर्देश करण्याची आवश्यकता नाही. शिवाजीची मातुःश्री जशी जिजाबाई, तशीच बाजीरावाची मातुःश्री राधाबाई ही एक राज्यांतील प्रचंड शक्ति होती. गोपिकाबाई, रमाबाई, आनंदीबाई यांची कर्तबगारी सुविख्यात आहे. शिवाजीने कर्नाटकांत स्वारी करून सावत्र बंधु एकोजीशी कलह मांडला, त्या बिकट राजकारणाचें निरसन एकोजीची बायको दीपाबाई इनें केलें. या दीपाबाईची वाखाणणी प्रत्यक्ष शिवाजीनेच केलेली आढळते. 'आमची भावजयी शहाणी. त्यांनी योग्य निकाल लावला,' असें म्हणून बंधूचा जिंकलेला प्रदेश शिवाजीने या भावजयीच्या स्वाधीन केला. अशा स्त्रिया आपल्या सामर्थ्यानें राज्यें सांभाळीत, हा त्यांचा गुण चिरस्मरणीय नाही काय? शिवाजीच्या दोघी सुना, संभाजीची बायको येसूबाई व राजारामाची ताराबाई, एवढ्या पराक्रमी व लौकिकवान् निघाल्या की, त्यांच्या कर्तबगारीची छाप मराठी राज्यावर कायमची बसली. महादजी सिंद्यांच्या तिघी स्त्रिया लक्ष्मीबाई, भागीरथीबाई व यमुनाबाई यांनी दौलतराव सिंद्यांशीं तीन चार वर्षें प्रचंड युद्ध संग्राम करून सर्व हिंदुस्थान हालवून सोडलें, हें कितीकांस माहीत आहे? मात्र हा युद्धकलह केवळ आपसांतला असल्यामुळे त्यास राष्ट्रोपकारक स्वरूप प्राप्त झालें नाही. पण त्यामुळे त्या स्त्रियांच्या नैसर्गिक पराक्रमास वैगुण्य येत नाही.

दौलतराव सिंद्याची बायको बायजाबाई हिचें नांव अव्वल इंग्रजींत विशेष गाजलें. पराक्रमास क्षेत्र नसल्यामुळे या बाईचा कोंडमारा झाला. स० १८३४ सालीं वैधव्य स्थितींत ती ग्वाल्हेरचा कारभार करीत असतां मिस् पार्क नांवाची एक इंग्रज बाई या राणीकडे पाहुणचारासाठी आली. या इंग्रज बाईला घोड्यांचा शौक असून अश्वारोहणांत ती आपणास पटाईत समजे. तिच्यासाठी बायजाबाईने मुद्दाम एक अश्वप्रदर्शन भरविलें. त्यावेळीं ग्वाल्हेरकरांजवळ वीस-पंचवीस हजार स्वारांची फौज सज्ज होती. बायजाबाईने एक घोडा समोर आणून त्या इंग्रज पाहुणीला सांगितलें, "याच्यावर बसून दाखवा." बाईने आपली शिकस्त केली, पण तो घोडा तिला नुसता हात लावूं देईना. हिरमुसली होऊन ती परत आली, तेव्हा बायजाबाईने मागे दासी उभी होती, तिला डोळ्याची खूण केली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि सांगितलें, " पहा ग, तुला हा घोडा बसूं देतो का ! " लगेच ती दासी लुगड्याचा काचा मारून चटकन त्या घोड्यावर आरूढ झाली आणि घटका-अर्ध घटकेंत त्याला दौडवून इतका नरम करून आणला कीं, त्या इंग्रज बाईला मराठी स्त्रियांच्या या अश्वारोहण-कौशल्याचें मोठें आश्चर्य वाटलें. त्या बाईनेच ही हकीकत आपल्या प्रवासवर्णनांत लिहून ठेविली आहे. स्वराज्य असलें, म्हणजे राष्ट्रगुणांचें संगोपन कसें होतें, हा प्रकार यांत दिसून येतो.

मी कांही केवळ हिंदु स्त्रियांचेंच वर्णन करीत आहें, असें नाही. हिंदुस्थानांत झालेल्या कोणत्याहि धर्माच्या किंवा समाजाच्या स्त्रिया असल्या, तरी कर्तबगारीच्या दृष्टीने त्या सर्व समान होत. मुसलमानांच्या कित्येक स्त्रिया हिंदूंसारख्याच नामवंत झाल्या. नूरजहान, मुम्ताजमहल, जहानआरा, औरंगजेबाच्या कन्या झेबुन्निसा व झीनतुन्निसा यांचीं चरित्रें इतिहासांत थोडींबहुत मशहूर आहेत. झीनतुन्निसा या बेगमेनें येसूबाई व तिचा पुत्र शाहू हीं बादशहाच्या कैदेंत होतीं, त्यांचा परामर्श घेतला. किंबहुना, त्यांना पुढे चांगले दिवस दिसले, ह्याचें श्रेय या परोपकारी बाईलाच दिलें पाहिजे. दुसऱ्या एका दृष्टीने एक मुसलमान बाई अब्दाली-मराठ्यांच्या झगड्यांत प्रमुख होती. तिचें आख्यान फारसें कोणास माहीत नाही. हिचें नांव मुगलानी बेगम. पंजाबचा सुभेदार मीर मन्नु म्हणून होता, त्याची ही बायको मोठी जहांबाज, हरएक कपटांत निष्णात व राजकारण हालविणारी झाली. मीर मन्नू मेल्यावर पंजाबचा कारभार हिच्या हातांत आला, तेव्हां अब्दालीला हिंदुस्थानांत आणून मराठ्यांची खोड मोडण्याचा उपक्रम तिने केला. स्वरूपसौंदर्य व आकर्षक भाषण यांच्या जोरावर ती आपला पगडा वाटेल त्याजवर बसवी. पंजाबच्या व दिल्लीच्या उमरावांची, त्यांच्या संपत्तीची व गुणावगुणांची बातमी या बाईला खडानखडा माहीत असून अब्दाली दिल्लीवर आला, तेव्हा तेथील धनिकांची व त्यांच्या गुप्त संपत्तीची संपूर्ण माहिती तिने अब्दालीस पुरविली, त्या आधारावर त्याने सर्व दिल्ली लुटून फस्त केली. अब्दालीने या बाईचा बडेजाव अतोनात वाढवून तिच्याकडून आपला मतलब साधला. त्याने तिला जागिरीचीं वचनें दिलीं. " मीर्झा " म्हणजे राजपुत्र असा किताब तिला देऊन इतकें कांही खूष केलें कीं, चार-दोन महिनेपावेतों अब्दालीची मर्जी सांभाळण्याकरितां दिल्लीचे उमराव मुगलानी बेगमेच्या पायांशीं लोटांगणें घेत. पण अब्दालीहि तिला पूर्ण ओळखून होता. स. १७५७ च्या एप्रिलांत तो परत स्वदेशीं जाण्यास निघाला, तेव्हा ती त्याजपाशीं आपल्या श्रमांचें बक्षीस मागूं लागली. मग तो तिची भेटहि घेईना. लाहोर, अटकपावेतां ती तशीच त्याच्या मागोमाग त्यास अडवीत गेली. शेवटीं नाइलाज होऊन त्याने तिला छड्यांनी बडवून घालवून दिलें. तेव्हा ती पुढे अन्नान्न दशेंत मरण पावली. तिचें भरपूर चरित्र मिस्किन नांवाच्या तिच्याच एका नोकराने फारशींत लिहिलेलें ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें आहे. मुगलानी बेगमेच्या कर्तबगारीचा हाहि एक प्रकार इतिहासांत संस्मरणीय नाही का ?

ताई तेलीण, झाशीची राणी, तुळसाबाई होळकर अशा कित्येक स्त्रियांच्या हकीकती वाचकांस थोड्या बहुत अवगत आहेत, म्हणून त्या मी येथे सांगत नाही. पंजाबच्या रणजीतसिंहाचा इतिहास पुष्कळांस अवगत आहे, पण त्याची राणी जिंदनकौर व तिचा पुत्र धुलीपसिंह यांचीं चरित्रें इंग्रजींत भरपूर असून तीं वाचल्यावर त्यांच्या दुर्दैवी कहाणीने हृदय भरून आल्याशिवाय राहत नाही. धुलीपसिंह दहा वर्षांचा असतांना डलहौशीने त्याचें राज्य व कोहिनूर हिरा त्याजकडून घेतला आणि त्यास अल्प नेमणूक देऊन युरोपास पाठविलें आणि त्याच्या मातुःश्रीस काशी येथे प्रतिबंधांत ठेविलें. धुलीपसिंह ख्रिस्ती झाला, युरोपांत भटकून थकला आणि इंग्रजांच्या वैराने नखशिखांत जळून गेला. मातुःश्रीलाहि त्याने पारिस येथे नेलें. उभयतांचे अंत कष्टप्रद झाले. लेडी लोगिन म्हणून धुलीपसिंहाची पालनकर्ती इंग्रजांनी नेमलेली होती, तिने आपल्या आठवणीचें भलें मोठें पुस्तक लिहिलें आहे, तें जिज्ञासूंनी वाचल्यास राजकारणाचे देखावे कसे बदलत जातात, तें कळून येतें.

जोधपुरची इंद्रकुमारी व उदेपुरची कृष्णाकुमारी या राजपूत स्त्रियांचीं नांवें विशिष्ट कारणांनी प्रख्या पावलीं, त्यांच्या हकीकती येथे सांगूं लागल्यास त्यासाठी एक स्वतंत्र ग्रंथ करावा लागेल. नेपाळ व कुर्ग येथील राजकन्यांचीं चरित्रें अव्वल इंग्रजींत गाजलेलीं आहेत. नाना फडणिसाची शेवटची स्त्री जिऊबाई इच्यावर बाजीरावाचा डोळा असतां मोठ्या हिकमतीने तिने आर्थर वेल्स्लीशीं संधान बांधून आपल्या शीलाचा बचाव केला, तें तिचें धैर्य नांवाजण्यासारखेंच म्हटलें पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

ख्रिस्तधर्मी स्त्रियाहि कित्येक या विषयांत माझ्या स्मरणांत आहेत. क्लाइव्ह व वॉरन्हेस्टिंग्स यांचीं नांवें इंग्रज बादशाहीचे संस्थापक म्हणून इतिहासांत झळकतात, पण नीतिमत्तेच्या दृष्टीनें त्यांच्या नांवांस लागलेले डाग कालत्रयीं निघणारे नाहीत. क्लाइव्हने आत्महत्या केली आणि हेस्टिंग्सला सात वर्षे पार्लमेंटापुढे कैदी होऊन पापांचा झाडा द्यावा लागला. या हेस्टिंग्सची बायको मारियन इचा इतिहासहि नवऱ्याच्या कीर्तीस शोभेसाच बनला, हें फारसें कोणास माहीत नाहीं. 'माझी प्रिया मारियन'× या नांवाचें एक सुंदर पुस्तक इंग्रजींत आहे, तें जिज्ञासूंनी अवश्य वाचावें. मूळची ही जर्मन बाई सरदार इमॉफची विवाहित बायको. नवऱ्यासह स. १७६९ त हिंदुस्थानांत येत असतां त्याच बोटीवर हेस्टिंग्सहि प्रवासी होता. प्रवासास त्या वेळीं तीन चार महिने लागत. केप ऑफ गुडहोप जवळ हेस्टिंग्स समुद्र लागून महिनाभर विव्हळ झाला. या बाईने आजारांत हेस्टिंग्सची एवढी शुश्रूषा केली की, उभयतांची कायम सलगी जडली. पुढे नवऱ्याशीं काडी मोडून तिने हेस्टिंग्सशीं लग्न केलें. बारा वर्षे हेस्टिंग्सने गव्हर्नर जनरल म्हणून कारभार केला, तो काळ म्हणजे एखाद्या मोगल बादशहासही मागे टाकील अशा थाटाचा इतिहासांत गाजला. त्याचीं वर्णनें बर्क व मेकॉले यांच्या ग्रंथांत चिरस्मरणीय झालीं आहेत. मग त्या बारा वर्षांत हेस्टिंग्सच्या या प्रियकर पत्नीचा थाट व दिमाख केवढा असेल, याची कल्पना करावी. कलकत्त्याजवळ अलीपुर येथें हेस्टिंग्सचा वाडा होता, त्यावरून या बाईला 'अलीपूरची माता' हें टोपण नांव प्रचारांत पडून बंगाल प्रांतांत ती एक कायम थट्टेचा विषय बनली होती. एक इंग्रज नोकरींतून कमी झाला व आपल्या मित्रास विचारूं लागला, 'मला एखादी भरीव नोकरी मिळविण्याची युक्ति सांग रे!' मित्र म्हणाला, 'वा: युक्तीला रे काय तोटा? ती अलीपूरची माता मारिया आहेना, तिच्या जाऊन पायां पड किंवा जवळ असेल नसेल, तें विकून त्या 'पूलबंदां'ची भर कर, म्हणजे नोकरी ठेवलेली.' पूलबंदी हें सरन्यायाधीश एलिजा इंपे याचें टोपण नांव त्यावेळीं लोकचर्चेत होतें. अशी ही सुप्रसिद्ध इंग्रज मुत्सद्यांची नीतिमत्ता इतिहासांत गाजली आणि हेच लोक आम्हां प्राच्य लोकांस 'एशियाटिक' म्हणून हिणवितात. मारियन बाईने हेस्टिंग्सला अखेरपर्यंत सोबत केली. त्यांचा पत्रव्यवहार वाचण्याजोगा आहे.

× My Beloved Marian by K. L. Murray, 1938, Jerraulds Publishers, London.

बेगम समरू नांवाच्या दुसऱ्या एका कर्तबगार बाईचें नांव इतिहासांत झळकलें आहे. ही मूळची काश्मीरची मुसलमानीण. वॉल्टर रेनार्ट नांवाचा एक जर्मन सेनानायक नवाब मीर कासीमजवळ नोकरीस होता, त्याची ही बायको. नवऱ्याच्या पश्चात् ती त्याच्या लष्करी पथकाची मालकीण होऊन शहाआलम बादशहाच्या नोकरीस राहिली आणि तीस वर्षेपावेतों अंगच्या पराक्रमाने तिने अनेक संकटांतून त्या दुर्दैवी बादशहाचा बचाव केला. तिने ख्रिस्ती धर्म स्वीकारून मोठा लौकिक मिळविला. मीरतजवळ सारधाना येथे तिची जागीर असून तिच वाडे वगैरे विद्यमान आहेत. बेगम समरू हें तिचें नांव इतिहासप्रसिद्ध आहे.

लिहितां लिहितां प्रकरण कल्पनेबाहेर लांबलें. स्वराज्याच्या दीड दोनशे वर्षांच्या काळांत पुरुषांप्रमाणेच हिंदी स्त्रियांनी देखील केवढी कर्तबगारी गाजविलेली आहे, याची जाणीव आज सर्वत्र बुजालेली दिसते आणि आपल्या प्राच्य स्त्रिया अज्ञानी व कर्तृत्वशून्य असून हल्लीच काय ती इंग्रजी राज्यांत त्यांची उन्नति होत आहे, असा समज प्रचलित झालेला दिसतो. तो किती अवास्तव आहे आणि जिवंत राष्ट्राला कोणत्याहि काळात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांच्या कर्तृत्वाची केवढी जरूर असते, हेंच मला मुख्यत्वें सांगावयाचें आहे. मी केवळ पांच-पंचवीस ठळक उदाहरणें या लेखांत आणलीं आहेत, पण त्याशिवाय आणखी कितीतरी अशींच उदाहरणें इतिहासांत आढळतात, तीं वाचून आपले मिथ्या ग्रह दुरुस्त होतील, तर आपल्या उदयेच्छु राष्ट्राला एक नवीन पाठिंबा मिळून आजकालच्या विजयलक्ष्मीसारख्यांना विशिष्ट स्फुरण मिळेल, असें मला वाटतें. एवढें सांगून मी वाचकांची रजा घेतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुशिक्षित दगड

मूळ लेखकः--फिओडोर सोलोगॉव्
अनुवादकः--प्रा. भा. म. गोरे.

सांगली येथील विलिंग्डन कॉलेजांतील इंग्रजीचे प्राध्यापक भा. म. गोरे हे 'लघुतमकथा' (Short-Short-Story) या वाङ्मयप्रकाराचे एक निष्ठावंत पुरस्कर्ते या नात्याने महाराष्ट्रास सुपरिचितच आहेत. स्वतः प्रा. गोरे यांनी अनेक स्वतंत्र व सुंदर लघुतमकथा लिहिल्या आहेत.

पाश्चिमात्य वाङ्मयांतील आदर्श लघुतमकथांचा मराठी वाचकांस परिचय व्हावा, म्हणून तशा उत्तमोत्तम लघुतमकथांचा 'युगवाणी'त अनुवाद देण्याचा प्रो. गोरे यांचा मानस आहे. तदनुरूप सोलोगॉब् यांच्या एका लघुतमकथेचा अनुवाद येथे देण्यांत येत आहे.

लेखकपरिचय

फिओडोर सोलोगॉव् (१८६३-१९२७)

[सोलोगॉव् या प्रसिद्ध रशियन कथालेखकाची ख्याति मागे कादंबरीकार म्हणून असे, तर आता ती लघुकथा—लघुतमकथा लेखक म्हणून अधिक आहे. त्याच्या लेखनांत गूढवाद आहे, तसाच वास्तववादहि आहे. रूपक व अन्योक्तीची त्याला फार हौस असे. त्याच्या दीर्घ कादंबऱ्या डोस्टोवस्कीच्या वळणाच्या असून त्या त्याच्या कथांच्या मानाने हल्ली मागे पडलेल्या आहेत. त्याच्या लघुकथांत व लघुतम-कथांत, सूचकता, मार्मिकता, उपरोध वगैरे त्याचे गुण फार रेखीवपणें दिसून येतात. खलील जिब्रानची काव्यमय शैली त्याच्या लघुतमकथांतून दिसून येणार नाही, परंतु जीवन-मूल्यांची अचूक अनुभूति मात्र वाचकांना चटका लावल्याशिवाय राहणार नाही.]

एका शहरांत दगडी गोट्यांचा एक रस्ता होता. त्यावरून वेगाने जाणाऱ्या एका गाडीच्या धक्क्याने त्यांतील एक गोटा तुटून सुटा झाला.

तो स्वतःशींच म्हणाला—"वा ! छान झालं, हेंच हवं होतं मला. मी स्वतंत्र होणार ! एकटा राहणार ! ह्या वागेरड्या गोट्यांच्या गोटांतच कां म्हणून पडून रहावं मी ?"

—रस्त्याने जाणाऱ्या एका पोराने तो दगड उचलून घेतला. तो पुढे चालूं लागताच तो दगडहि डौलांत म्हणूं लागला, "पाहिलंत ! खूप प्रवास करण्याची माझी इच्छा होती, तर निघालोंच की नाही प्रवासाला ? इच्छाशक्ति प्रबल असली की झालं, हवं तें साध्य होतं."

—रस्त्याने जातां जातां त्या पोराने तो दगड सहज दूर भिरकावला. लगेच तो दगड म्हणूं लागला, "अरे वा ! आता उडायलाहि लागलों की मी ! किती सोपं असतं हें काम ! नुसती इच्छा करायची की झालं !"

—खळकन् एक आवाज झाला. एका खिडकीचें तावदान फुटून तो दगड आंत पडला. काच बिचारी म्हणूं लागली, "आई ग ! मेलें ! काय सत्यानाश हा ! अरे दगड्या, धोंड्या, मेल्या, चाललास तरी कुठे असा ?"

तो दगड आता गुर्मीत आला होता. तो म्हणाला, "मग ? माझ्या वाटेंतून तूंच दूर व्हायला पाहिजे होतंस. माझ्या प्रगतीच्या आड येणाऱ्या साऱ्यांची दशा अशीच व्हायची, समजलीस ?

—खिडकींतून आंत शिरलेला तो दगड एका मऊ बिछान्यावर पडला होता. तो म्हणाला, "हं ! हें देखील ठीकच झालं. पुष्कळ भराऱ्या मारल्या, आता थोडी विश्रांति हवीच. प-डूं-या जऽरा आऽऽरामांत !"

—तेवढ्यांत त्या घराची झाडलोट करणारा नोकर केरसुणी घेऊन आंत आला. बिछान्यावर पडलेला तो दगड पाहून त्याने एक अभद्र शिवी हांसडली, आणि त्या दगडाला खिडकींतून खाली भिरकावलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकासःमहाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—'धाड्!' रस्त्यावरच्या दगडांनी माना वळवून वर पाहिलें, तों हा सुशिक्षित दगड हसत हसत त्यांना म्हणाला,—"कसं काय चाललंय, दोस्त हो? हें बघा, तें पलीकडलं थोरलं घर आहे ना, त्यांतल्या लोकांचा फार आग्रह पडला म्हणून मघाशीं मी जरा त्यांच्या भेटीला गेलों होतों. पण खरं सांगूं? या बड्या सरदार उमरावांचा सहवास आपल्याला नाही बुवा पसंत! बस! आपल्या स्वतःच्या समाजांतल्या साध्या-सुध्या, अडाणी दगडांत केव्हा जाऊन पडतों, असं झालं होतं मला. म्हणून तर त्या लोकांनी बळेंच पुढे ठेवलेलं सारं वैभव हें असं लाथाडलं मी—अन् हा असा येऊन मिसळलों पुन्हा तुमच्यांत...

—केवढा स्वार्थत्याग आहे हा माझा? आहे की नाही?"

अन् साऱ्या अडाणी दगडांनी या सुशिक्षित दगडापुढे आदरानें, भक्तीनें, कृतज्ञतेने माना वाकविल्या!!

---

० शरद् ऋतूंतील संध्याकाळ

मूळ लेखकः—मॅक्झिम गॉर्की
अनुवादिकाः—लीला देशमुख बी. ए.

मराठींतील लघुकथांना शैथिल्याचें जें वळण लागूं पाहत आहे, तें नष्ट होण्याचा एक प्रयत्न म्हणून परभाषांतील उत्कृष्ट लघुकथांचा, मूळ नांवें व वातावरण कायम ठेवून, मराठी अनुवाद देण्याचें 'युगवाणी' ने ठरविलें आहे. गॉर्कीच्या एका कथेचा प्रस्तुत अनुवाद येथे याच हेतूने दिलेला आहे.

हा अनुवाद नागपूरच्या नवोदित लेखिका लीला देशमुख यांनी केलेला आहे 'वीणा' व 'दोन घडींचा डाव' या कादंबऱ्यांमुळे लीला देशमुख कथावाचकांस परिचित आहेतच.

(**मॅक्झिम गॉर्की**चा परिचय कुणाला नाही? 'आई' ह्या कादंबरीने गॉर्कीच्या साहित्यिक कीर्तीचा कळस गाठला. दारिद्र्यांतील क्षुल्लक पण उटावदार भावनांची पकड घेणारीं दृश्यें रेखाटण्यांत गॉर्कीची लेखणी किती कुशल होती, ह्याचा परिचय त्याच्या कादंबऱ्या वाचतांना तर येतोच, पण लघुकथा वाचतांनाही येतो. प्रस्तुत गोष्ट 'An Autumn Evening' ह्या लघुकथेचा अनुवाद आहे. दारिद्र्याच्या पार्श्वभूमीला निसर्गाची उत्तम जोड घालून ह्या उटावदार परिस्थितींत भावनांचं किती मार्मिक आणि पकड घेणारं दृश्य गॉर्कीनं रेखाटलं आहे, ह्याचा प्रत्यय ही कथा वाचतांना वाचकांना खचित येईल.)

शरद् ऋतूंतल्या एका संध्याकाळीं मी मोठ्या विचित्र संकटांत सांपडलों. खिशांत एक कवडी नव्हती आणि गावांत कुठे राहायं म्हटलं, तर त्या ठिकाणीं मी नुकताच आलों असल्यामुळे मित्रांच्या घरीं उतरण्याचीहि शक्यता नव्हती.

पहिले कांही दिवस माझ्या जवळचे कपडे विकून मी कांही दिवस घालविले. नंतर त्या शहराचा युटसे नांवाचा एक छोटासा भाग होता, तिकडे गेलों. त्या ठिकाणीं जहाजांचे मोठमोठे धक्के होते. ज्या वेळीं त्या ठिकाणीं एखादं जहाज असे, त्या वेळीं तो सबंध भाग गजबजून गेलेला असावयाचा. परंतु आता आक्टोबरचे अखेरचे दिवस असल्यामुळे सगळीकडे शांत होतं. धक्क्याच्या अलीकडे खलाशी लोकांच्या करितां जीं तात्पुरतीं घरं बांधलेलीं होतीं, त्या घरांच्या जवळ उभं राहून अन्नाचे कण कुठे दिसतात का, हें मी शोधूं लागलों. माझ्या मनांत आलं, "भरलेलं पोट असणं ही किती सुखाची गोष्ट आहे!"

देशाच्या अशा आर्थिक परिस्थितीमध्ये माणसाला एकवेळ अंतःकरणाची भूक भागवितां येईल, पण

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोटाची ? तुम्ही एखाद्या रस्त्यावरून जाऊं लागलांत, आजूबाजूला ज्यांची बाहेरची बाजू चांगली दिसते आहे अशीं घरं असलीं कीं, साहजिकच आंतलाहि भाग चांगला असला पाहिजे, असा तुमचा तर्क होतो. चांगले कपडे घातलेलीं माणसं तुम्हांला भेटतात, परंतु आमच्या सारखे लोक दृष्टीस पडले कीं, त्यांना टाळण्याकरतां तुम्ही एका बाजूला होतां !

हलके हलके संध्याकाळ होत होती. पाऊस पडत होता. अंगावर शहारे उभे करील असा वारा उत्तरेकडून वाहत होता. रिकाम्या असलेल्या घरांच्या मधून, दुकानांमधून, हॉटेलच्या उघड्या खिडक्यांमधून 'सूंऽऽ' असा आवाज करीत तो आंत शिरत होता. वाऱ्याच्या त्या सोसाट्यामुळे नदीच्या लाटा वर उंच उसळून किनाऱ्यावरच्या वाळूवर आदळत होत्या. पाण्याचे पांढरे शुभ्र तुषार अंधारांत क्षणभर चमकून लगेच नाहीसे होत. किंबहुना, नदीला सुद्धा लवकरच येणाऱ्या हिवाळ्याची भीति वाटत असावी. आकाश गच्च भरलेलं होतं. आणि हळू हळू पाऊस जोरांत पडत होता. ज्यांची नुसतीं खोडं शिल्लक आहेत, अशा दोन विलो वृक्षांच्यामुळे त्या जागेची भयाणता आणखीच वाढली होती. त्या खोडांच्या बुंध्यांशीं उलटी करून ठेवलेली एक होडी होती. त्या बोटीचा तळ फुटका होता. तळ फुटलेली बोट, ज्यांचीं पानं हिवाळ्यांतल्या वाऱ्यानं हिरावून घेतलीं आहेत अशीं तीं जुनाट झाडं,—सगळंच जणूं काय मोडकं, उदास, भयाण ! आणि त्याच्याच भरीला आकाशहि अश्रु ढाळीत होतं. माझ्या आजूबाजूचा सगळा प्रदेश ओसाड होता. जणूं त्या सगळ्या थंड निर्जीव वस्तूंमध्ये जिवंत असा मीच काय तो होतों आणि माझ्याकरतांहि मृत्यु वाट पहात होता.

मी त्या वेळीं सारा सतरा वर्षांचा होतों. म्हणजे आयुष्यांतली फार चांगली वेळ !

त्या थंड ओलसर वाळूवरून मी चालत होतों. थंडीनं आणि भुकेनं माझे दांत करकर वाजत होते. अन्नाचा कुठंहि शोध लागत नाहीं असा विचार करीत मी एका पडक्या दुकानाजवळ आलों. आणि नवलाची गोष्ट ही कीं, त्या दुकानाच्या बाहेरच्या बाजूला एका स्त्रीची खालीं वाकलेली अंधूक आकृति माझ्या दृष्टीस पडली. तिचे सगळे कपडे पावसानं ओले झाले असावे. पाण्याचे ओघळ तिच्या दोन्ही खांद्यांवरून खालीं वाहत होते. तिच्या मागे उभं राहून ती काय करते, हें पाहण्याचा मीं प्रयत्न केला. दुकानाच्या फळीच्या खालीं ती दोन्ही हातांनीं खळगा करीत होती.

मी थोडासा वाकलों अन् म्हटलं, "तूं कशासाठी करते आहेस हें ?"

माझा आवाज ऐकतांक्षणीच ती अस्पष्टपणे ओरडली. आणि उडी मारून बाजूला झाली. विस्फारलेल्या, घाऱ्या पण घाबरलेल्या नजरेनं ती जेव्हा माझ्याकडे पाहूं लागली, तेव्हा माझ्या लक्ष्यांत आलं कीं, ती माझ्याच वयाची आहे—आकर्षक चेहरा, पण त्यावर तीन डाग होते. ह्या डागांच्यामुळे तिच्या चेहऱ्याला कांहीशी कुरूपता आली होती खरी. दोन डाग तिच्या दोन्ही डोळ्यांच्या खालच्या बाजूला होते आणि एक मोटासा डाग दोन भिवयांच्या मध्ये होता. त्या मुलीनं थोडा वेळ माझ्याकडे पाहिलं आणि मग तिच्या डोळ्यांतली भीति हलके हलके निघून गेली. हाताची बाही झटकली, डोक्यावरचा कापडाचा रुमाल नीट सरकविला आणि खांदे जरासे उंच करीत तिनं म्हटलं, "तुला सुद्धा भूक लागली आहे ना ? ठीक–हा खळगा पुढं खण तूं. माझे हात मघापासून थकले आहेत—" दुकानाकडे पाहून तिनं मान हलविली आणि पुढे म्हटलं—" त्या ठिकाणी अन्न असलं पाहिजे. तें दुकान अजूनहि उघडं आहे."

मी खणायला सुरवात केली. ती थोडा वेळ थांबली आणि मग मला मदत करूं लागली. आम्हीं दोघंहि एक शब्द न बोलतां खणीत होतों. आपण कांहीतरी विचित्र करतों आहों, अशी कल्पना सुद्धा माझ्या मनांत आली नाही. हा खळगा खणतां खणतां आपल्याला काय सापडेल, ह्या विचाराखेरीज दुसरा कोणताहि विचार माझ्या मनांत नव्हता. संध्याकाळ संपून जिकडे तिकडे रात्रीचा दाट काळोख पसरला. लाटांचा आवाज कानांत शिरत होता. आणि पावसाचे शिंतोडे दुकानाच्या फळीवर ताड्ताड् वाजत होते.

"खाली दगड आहे का ?" तिने हलकेच विचारलं, ती काय विचारते आहे, हें मला कळलं नाही. त्यामुळे मी कांहीच बोललों नाही.

"ह्या दुकानाच्या फळीच्या खाली फरशी आहे का ? जर असेल, तर आपण उगीच खणीत आहों. समजा, आपण खणलं आणि आंतल्या बाजूला जर मोठी

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लाकडी फळी असली, तर ती बाजूला करून आंत कसं जायचं? मी म्हणतें, कुलुप फोडायला काय हरकत आहे? कुलूप फोडणं म्हणजे कांही फारशी कठीण गोष्ट नाही—"

उपयुक्त अशी कल्पना बायकांच्या डोक्यांत एखादे वेळींच येते. पण येते एवढं मात्र खरं. अशा कल्पना मला नेहमीच आवडतात आणि मी शक्य तोंवर त्यांचा भरपूर फायदा घेतों.

कुलूप सापडल्यानंतर तें फोडणं फारसं कठीण नव्हतं. त्याला एक झटका देऊन ठोसा दिल्याबरोबर दाराची फळी मागे झाली. माझ्या मागे उभं राहून तिनं म्हटलं,

"छान."

बायकांनी एखादा देखील स्तुतिपर शब्द उच्चारला, तर पुरुषांना त्याची फार मोठी किंमत वाटते. परंतु माझं त्याकडे बिलकूल लक्ष नाही, असं दाखवीत मी तुटकपणेंच पण काळजीच्या स्वरांत विचारलं—

"आहे का कांही?"

मोठ्या उत्साहानं तिनं शोधायला सुरवात केली.

-बाटल्या ठेवलेला एक खोका, रिकाम्या पिशव्या, एक छत्री, एक लोखंडी घागर.

ह्यांपैकी एकहि वस्तु खाण्याची नव्हती. आज आपलं पोट कांही भरत नाही, असा विचार माझ्या मनांत येतो न येतो, तोंच ती उत्साहानं ओरडली,

"सापडलं हं."

"काय?"

"ब्रेड, एक मोठा तुकडा. थोडासा ओला झाला आहे—पण चालेल. हं, घे."

तिच्या हातांतून ब्रेड घेऊन त्याचा एक तुकडा मी तोंडांत टाकला आणि चघळूं लागलों.

"ए, मला दे की!—हें बघ, आता ह्या ठिकाणीं आपण राहतां कामा नये. पण जायचं कुठं?"—त्या समोरच्या काळोखांत तिनं चारी बाजूला वळून पाहिलं.

"ती फुटकी बोट आहे, तिथं आपण जाऊं या का?"

"हं, चल. असं म्हणून आम्ही निघालों. जातां जातां ब्रेडचे तुकडे तोडून तोंडांत कोंबीत होतों. पाऊस आणखीच जोरांत येत होता. नदी मोठ्यांदा आरोळ्या ठोकीत पुढे जात होती. जणूं शरद ऋतूंतल्या ह्या भयाण, घाबरट्या संध्याकाळचे आम्ही दोघं पराक्रमी वीर होतों. तुकडे चघळल्यामुळे माझ्या छातींत दुखूं लागलं होतं पण मी खाणं तसंच चालू ठेवलं होतं. ती देखील माझ्या डाव्या बाजूनं चालत तुकडे खात होती.

कां कोण जाणे, पण मी एकदम तिला विचारलं,

"तुझं नांव काय?"

चघळत चघळत तिनं म्हटलं "नॉटश्या."

मीं तिच्याकडे पाहिलं. माझ्या अंतःकरणांत कळ आली. माझ्या समोर पसरलेल्या काळोखांत मी दृष्टि टाकली. मला वाटलं जणूं काय माझं नशीब थंडपणानं, उपहासानं माझ्याकडे पाहून हसत आहे!

× × ×

बोटीवर देखील पावसाच्या सरी जोरांत आदळत होत्या. त्या आवाजानं माझं मन खिन्न झालं. खालच्या फुटक्या तळांतून वारा आंत शिरत होता. किनाऱ्यावर लाटा आदळत होत्या. त्या आवाजामुळे जिकडे तिकडे निराशा, दुःख आणि शोक पसरलेला होता; जणूं काय, ती सगळी परिस्थिति थकलेली होती; आणि ह्या सगळ्या भयाणतेंतून तिला पळ काढायचा होता. ओसाड वाळूवरून वारा सोसाट्यानं वाहत होता; आणि नदी शोक करीत होती!

त्या बोटीच्या खाली आम्ही कसेबसे बसलों. आम्ही दोघंही पावसानं चिंब झालों होतों. बोटीच्या फुटक्या-तळांतून थंड पाण्याचे थेंब आंत गळत होते आणि त्यामुळे विलक्षण थंडी वाजत होती. मला झोपायला हवं होतं. बोटीच्या कडेला पाठ टेकून नॉटश्या बसली. ऊब यावी म्हणून गुडघ्यावर तिने कुंकर घातली. त्यावर आपली हनुवटी टेकली; आणि समोरच्या नदीकडे ती पाहूं लागली. फिका चेहरा, खालचे डाग—ह्यामुळे तिचे डोळे विलक्षण वाटत होते. डोळ्यांची पापणी न हालवितां ती सारखी टक लावून बघत होती; त्यामुळे मला तिची भीति वाटली. तिच्याशीं बोलावं, अशी खूप इच्छा झाली. पण कशी सुरवात करावी, तें कळेना.

पण तिनेच सुरवात केली.

जणू, मनाशीं कांही तरी टरवून बोलल्यासारखें ती एकदम उद्गारली "वा! काय छान आयुष्य चाललं आहे!"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे उद्गार काढण्यापूर्वी तिने खूप विचार केला असावा आणि अखेरीस त्या विचारांचा असा निष्कर्ष काढला. तिचे उद्गार खोटे ठरविण्याचं मलाहि कांही कारण नव्हतं; म्हणून मी गप्प बसलों. मी तिथे बसलों आहें, ह्याची तिला मुळीच जाणीव नसल्यासारखी ती पुढं बोलूं लागली.

"खरंच, मला मरण येईल, तर किती बरं होईल!" तिने तसं कां म्हणावं, हें मला कळलं नाही. आयुष्याचा तिने खूप विचार केला असावा. ह्या जगांत आपलं नक्की स्थान कोणतं आहे, ह्याचा शोध घेतला असावा; आणि मग आयुष्यांत खरोखरच काय करतां येण्यासारखं आहे, असा विचार करतांना 'मरणाखेरीज आणखी काय शिल्लक आहे,' असा विचित्र विचार मानांत येऊन ती तसं बोलली असावी! परंतु तिचे ते शब्द ऐकून मला अतिशय वाईट वाटलं. आणखी कांही वेळ जर स्तब्धतेंत गेला असता, तर मला खात्रीनं रडूं कोसळलं असतं. एखाद्या स्त्रीसमोर पुरुषानं रडायचं, म्हणजे किती विलक्षण! आणि तेंहि तिच्या स्वतःच्या डोळ्यांत पाण्याचा एक थेंबहि नसतांना! तेव्हा कांही तरी बोलावं, म्हणून मी म्हटलं. "कुणी मारलं तुला?"

अगदी निर्विकारपणें तिने उत्तर दिलं, "तो सगळा पाशाकाचा दोष होता."

"पाशाका म्हणजे कोण?"

"माझा प्रियकर–"

"तो तुला नेहमी मारतो काय?"

"होय! जेव्हा जेव्हा दारू पितो, तेव्हा तेव्हा नेहमीच." बोलतां बोलतां ती चटकन् माझ्या जवळ सरकली. आणि मग स्वतःबद्दल, पाशाकाबद्दल, दोघांचं नातं काय ह्याबद्दल सगळ्या गोष्टी सांगायला तिनं सुरवात केली. ती एक वेश्या होती. आणि तिचा प्रियकर पाशाका–त्याच्या लालभडक मिश्या होत्या–आणि त्याला पेटी फार चांगली वाजवितां येत होती म्हणे—तो नेहमी किंमती कपडे वापरीत असे, म्हणून ती त्याच्या प्रेमांत पडली आणि तो तिचा प्रियकर झाला. एकदा असं नातं जोडल्यानंतर दुसऱ्या लोकांनी तिला दिलेले पैसे दाबायचा धंदा त्यानं सुरू केला; आणि त्या पैशावर दारू पिऊं लागला. परंतु एवढ्यावरच थांबता, तर ठीक. पण अखेरीस तिच्या डोळ्यादेखत तो दुसऱ्या बायकांच्या नादीं लागला.

"ह्या गोष्टीचा मला राग येणार नाही काय? त्या बायकांच्यापेक्षा मी खचित वाईट नाही. तो निर्दय मला चांगला बनवितो आहे. काल मी त्याच्या घरीं गेलें, तर तो खुशाल दुसऱ्या कुणावरोवर दारू पिऊन धुंद पडला होता! मी एकदम त्याच्यावर ओरडलें, 'पक्का दारुडा आहेस तूं–' तर त्याने मला ठोकायला सुरवात केली! माझे केस धरून ओढले. मी काय करूं शकणार होतें? माझं नवं जाकीट सुद्धा त्यानं फाडलं..."–बोलतां बोलतां तिचा आवाज अस्पष्ट होत गेला आणि अखेरीस ती गप्प बसली.–

वारा आणखीच जोरांत वाहूं लागला. त्याचा थंडपणा अंगावर शहारे उभे करीत होता. माझे दांत वाजूं लागले आणि ती देखील थंडीमुळे कापूं लागली. ती अगदी माझ्याशेजारीं होती आणि त्या अंधारांत सुद्धा तिच्या डोळ्यांतली चमक मी ओळखूं शकत होतों.

"खरंच, तुम्ही सगळे पुरुष कसे पशु असतां! तुमच्यावर कधी दया करूं नये, असं वाटतं. तुमच्या पैकी जर एखादा मरायला टेकला, तर रागानं त्याच्या तोंडावर थुंकेन मी. तुम्ही म्हणजे भयंकर आहांत! स्तुति करतां, फसवितां, एखाद्या कुत्र्यासारखं पायाशीं घोटाळतां, आणि एकदा का तुमच्या मनासारखं करण्याइतक्या आम्ही मूर्ख बनलों, की झालं, आमचं आयुष्य संपलंच! तुम्ही अगदी आमच्यावर उघड हल्ला करतां......तुमचा खरं म्हणजे कांही उपयोग नाही."

ती रागारागाने शिव्या देत होती खरी, पण तिच्यांत कांही शक्ति नव्हती. तिच्या तोंडांतून शब्द तुटकपणें बाहेर पडत होते. अगदी थंडपणें—त्यांत रागाचा त्वेष नव्हताच. परंतु तरीहि त्या शब्दांचा माझ्यावर फार परिणाम झाला. एखादं दुःख ऐकण्यापेक्षा तें प्रत्यक्ष डोळ्यासमोर दिसत असलं, तर त्याचा परिणाम नेहमीच फार खोल होतो.

मला अगदी संताप आला. थंडीचा तर आलाच होता, पण नॉटस्याच्या शब्दामुळे आणखी कशाचा संताप आला होता कोण जाणे. मी स्वतःशीच कण्हूं लागलों.

तितक्यांत मला दोन छोट्याशा हातांचा स्पर्श झाल्यासारखा वाटला. एका हाताचा स्पर्श मानेला; आणि दुसऱ्या हाताचा चेहऱ्याला—त्याबरोबर अगदी मृदु, जिव्हाळ्याच्या स्वरानं तिनं विचारलं,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" काय झालं ? "

नॉटश्या बोलत नसून दुसरंच कुणीतरी प्रश्न विचारतं आहे, असं मला वाटलं. नुकत्याच तिनं पुरुषांना शिव्या दिल्या होत्या...पण तीच आता काळजीच्या स्वरांत विचारीत होती;

" काय झालंय अं ऽऽ? थंडी वाजते काय? किती लहान आहेस रे तूं? एखाद्या भ्यालेल्या पाखरासारखा थरथर कांपतो आहेस—तुला थंडी वाजते आहे, असं कां सांगितलं नाहीस? ये—झोप असा—मी सुद्धा निजतें—आणखी जवळ सरक, म्हणजे तुझ्या अंगांत ऊब येईल—ही रात्र कशी तरी काढायची आहे—इकडे बघ! तूं सुद्धा पितोस काय?—पण पीत असलास, तरी हरकत नाही. "

ती माझी समजूत घालीत होती आणि उत्साह देत होती. खरंच, मला धिक्कार असो! खरं म्हणजे ह्यांत माझी काय वाईट परिस्थिति होती? ज्या वेळीं माणसाचं नशीब असं कां असतं, ह्या विषयी मी विचार करीत होतों; सगळी सामाजिक व्यवस्था बदलून कशी टाकतां येईल, ह्याविषयी मला स्वप्नं पडत होतीं;—राजकीय क्रांतीची मी दिशा ठरवीत होतों;—मी—ज्यानं कित्येक पुस्तकें वाचलीं होतीं—ज्याच्या विचारांचा त्या पुस्तकांच्या लेखकांना सुद्धा थांग लागला नसता—ज्या दिवसांत मी स्वतःला उत्साही, एक प्रेरक शक्ति बनविण्याचा प्रयत्न करीत होतों,—आणि इथं एक दुःखी, भुकेली, कशाच्या तरी शोधांत असलेली, निरुपयोगी, जिला आयुष्यांत कांही स्थान नाही अशी;—मला खरोखर मदत करीपर्यंत जी मला मदत करूं शकेल, ह्यावर माझा विश्वास नव्हता;—आणि माझ्या मनांत असूनहि मी जिला मदत करूं शकलों नाही—

ठीक! जणूं हें सगळं स्वप्नांत घडत आहे, असं मी समजत होतों—कसलं तरी विचित्र स्वप्न. परंतु स्वप्न आहे, असं कसं म्हणूं? कारण पावसाचे थंड थंब माझ्या अंगावर पडत होते. एका स्त्रीच्या स्पर्शामुळे माझ्या अंगांत ऊब आली होती. तिचा श्वास माझ्या गालांवर पडत होता. ज्या श्वासांत व्होडकाचा अस्पष्ट वास येत होता-पण त्यामुळे उत्साही वाटत होतं...... वाऱ्याचा 'सूंऽऽ' असा आवाज कानांवर पडत होता; पावसाच्या धारा बोटीवर थाड्थाड् वाजत होत्या. लाटा किनाऱ्यावर आदळत होत्या. आणि आम्ही दोघं थंडींत कुडकुडत एकमेकांना चिकटून बसलों होतों. हें सगळं खरं होतं—पण ह्या गोष्टी प्रत्यक्ष सत्यसृष्टींत घडत आहेत, ह्यावर माझा विश्वास नव्हता.

मृदु आणि सहानुभूतिपूर्ण आवाजांत फक्त बायकाच बोलूं शकतात. नॉटश्या बोलत होती, ती असल्याच आवाजांत. तिच्या त्या प्रेमळ जिव्हाळ्याच्या शब्दांनी मला किती तरी बरं वाटलं.—हृदय भरून आलं—

माझ्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. कांही तरी वाईट, कांही तरी मूर्खपणा, आणि ह्या रात्रीपूर्वी घडलेलं असं कांही तरी अनिश्चित-इत्यादि सगळ्या गोष्टी माझ्या हृदयांत एकदम उसळल्या असाव्या. नॉटश्या माझं समाधान करूं लागली, " किती वेड्यासारखं करतोस? पुरे कर पाहूं तुझं रडणं......छे, छे, तूं असं रडतां कामा नये. परमेश्वराच्या इच्छेनं तुझं सगळं कांही ठीक होईल-तुला चांगली जागा मिळेल.— "

माझ्या आयुष्यांत प्रथमच आलेल्या ह्या स्त्रीचा निकट स्पर्श—पण तो स्पर्श फार चांगला होता. कारण पुढे माझ्या आयुष्यांत ज्या ज्या वेळीं स्त्रियांशीं वागण्याचे असे प्रसंग आले, त्या त्या वेळीं मला फार मोठी किंमत द्यावी लागली. आणि माझा स्वतःचा मात्र कवडीचाहि फायदा झाला नाही.

" कसा विचित्र मुलगा आहेस तूं? तूं कुठं जाऊं शकत नसलास, तर मी उद्या तुला मदत करीन. " तिचे ते कोमल, सहानुभूतिपूर्ण शब्द सुद्धा कुठल्या तरी स्वप्नांत मी ऐकतों आहें, असं मला वाटत होतं.

प्रभात होईपर्यंत आम्ही दोघं तसेच बसलों होतों. दिवस उजाडल्यावर बोटीच्या खालून निघून शहरांत गेलों. तिथं एकमेकांचा निरोप घेतला. आणि, तेव्हापासून ह्या घटकेपर्यंत भेटलों नाही. जवळ जवळ सहा महिने, ज्या गोड नॉटश्याच्या सहवासांत मी शरद्-ऋतूंतील एक संध्याकाळ काढली, त्या नॉटशाला शोधण्यासाठी सगळं शहर पालथं घातलं.

आणि, ती जर खरोखर मेली असेल-असेल, तर फार बरं झालं म्हणायचं—तिच्या आत्म्याला शांति मिळो! आणि, ती जर जिवंत असेल, तर—तिच्या हृदयाला सुख मिळो! ती ज्या परिस्थितीला जाऊन पोचली होती, तिची तिला जाणीव न होवो—कारण, ती झाली, तर पुढच्या आयुष्यांत दुःख, वेदना—ह्या खेरीज आणखी काय आहे?......

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ : पूर्वपीठिका व सिंहावलोकन

श्री. ना. बनहट्टी

संघाचें पहिलें सम्मेलन ता. १३ व १४ जानेवारी १९२३ रोजीं उमरावती येथें भरलें होतें. स्वागताध्यक्ष कै. दामोदर केशव ओक हे असून अध्यक्षस्थानीं साहित्यसम्राट श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची योजना करण्यांत आलेली होती. या अधिवेशनांत **विदर्भ साहित्य संघ** ही संस्था स्थापन करण्याचा पहिलाच ठराव करण्यांत आला व दुसऱ्या ठरावाअन्वयें संघाची एक मुटसुटीत घटना मंजूर करण्यांत आली. या घटनेमध्यें 'विदर्भ' या शब्दांत पुढील प्रदेशांचा समावेश होत असल्याचें पहिल्याच कलमांत नमूद करण्यांत आलें. :—

वऱ्हाड, खानदेश, मराठी मध्यप्रांत व निजाम राज्याचा मराठी भाग.

'विदर्भ' या शब्दाची व्याप्ति याप्रमाणें ठरविल्यानंतर घटनेच्या दुसऱ्या कलमांत संघाचा उद्देश पुढीलप्रमाणे निर्दिष्ट करण्यांत आला :—

"ह्या संघाच्या कक्षेंत असलेल्या प्रदेशांतील प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाच्या सर्व शाखांचें संशोधन, संरक्षण, संवर्धन, प्रसिद्धि व चर्चा करणें, हा वरील संघाचा उद्देश राहील."

संघाची मुख्य कचेरी उमरावती येथेंच राहील असा घटनेंत स्पष्ट नियम करण्यांत आला. "दरसाल संघाचें एक सम्मेलन भरविण्यांत यावें" असाही नियम या घटनेंत नमूद आहे. संघाच्या दरसाल भरणाऱ्या अधिवेशनास परिषद म्हणावें की संमेलन म्हणावें, असा प्रश्न कोठे कोठे उपस्थित होतो. जुन्या घटनेंत संमेलन असाच शब्द आहे; हें या संबंधांत लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

या पहिल्या अधिवेशनांत पुढील तीन वर्षांकरितां संघाचें अधिकारी मंडळ नेमण्यांत आलें. त्यांत नामदार न्यायमूर्ति केशवराव कोरटकर हे अध्यक्ष, रा. मा. श्री. अणे, श्री. कृ. कोल्हटकर, या. मा. काळे, बा ग. खापर्डे, नी. ब. भवाळकर आणि नारायण नरसिंह फडणीस हे उपाध्यक्ष, प्रा. बळवंत गणेश खापर्डे हे सरचिटणीस, रा. विश्वनाथराव केळकर, कै. दु. आ. तिवारी, आणि कै. गणपतराव गोळेगांवकर हे तिघे सहायक चिटणीस आणि रा. त्रिंबक लक्ष्मण शेवडे हे खजिनदार, अशीं नांवें आहेत. यांखेरीज इतर सात सभासद आहेत.

संघाचें दुसरें संमेलन कै. यादव माधव काळे यांच्या अध्यक्षतेखालीं उमरावती येथेंच ता. १९, २० एप्रील १९२४ या तारखांस भरविण्यांत आलें, मात्र घटनेंतील नियमांस अनुसरून यास संमेलन न म्हणतां त्या वेळच्या वृत्तांतांत 'विदर्भ साहित्य संघ परिषद, अधिवेशन दुसरें' असें म्हणण्यांत आलें आहे. घटनेमध्यें वार्षिक अधिवेशनास संमेलन असें म्हटलें असतां पुढे परिषद असा शब्द कां व कसा रूढ झाला हें समजत नाही.

वृत्तपत्रांतील उल्लेख पाहतां नांवासंबंधानें मजेदार वैचित्र्य आढळून येतें. यवतमाळ येथें भरलेल्या तिसऱ्या अधिवेशनाची हकीकत देतांना 'महाराष्ट्र' पत्रांत 'विदर्भ साहित्य परिषद' असा मथळा वापरला आहे. पुढील वर्षीं हैद्राबादच्या अधिवेशनाची पूर्वसूचना वगैरे देतांना 'महाराष्ट्रां'त 'विदर्भ साहित्य परिषद्' याच नांवाखालीं मजकूर दिला आहे. परंतु पुढे दोनच आठवड्यांनी अध्यक्षांचें भाषण देतांना 'विदर्भ-साहित्य-संमेलन' असा मथळा देण्यांत आला आहे. जळगांव (पूर्व खानदेश) येथें भरलेल्या पांचव्या अधिवेशनास अनुलक्षून सर्वत्र 'विदर्भ साहित्य परिषद्' हा शब्द 'महाराष्ट्रां'त वापरण्यांत आला आहे. नागपूर येथें १९२९ सालीं भरलेल्या ६ व्या अधिवेशनाचा उल्लेख करतांना पुनः अनेक नांवांचा प्रयोग केलेला दिसतो. ८-९-२९ च्या 'महाराष्ट्रां'त 'विदर्भ साहित्य संमेलन' असा मथळा दिला आहे, तर १५-९-२९ च्या अंकांत 'विदर्भ साहित्य संघ-परिषद्' असा मथळा आहे. अमरावती येथें १९३७ सालीं भरलेल्या ७ व्या अधिवेशनाची पूर्वसूचना, कार्यक्रम, वृत्तांत वगैरे वृत्तपत्रांत प्रसिद्ध करतांना चिटणिसांनी 'विदर्भ साहित्य संघ-परिषद्' असाच नामनिर्देश सर्वत्र पद्धतशीर रीतीनें केलेला आढळतो. इतर लेखकांनी त्यासंबंधीं लिहितांना मात्र 'विदर्भ साहित्य संमेलन' याच नांवाचा प्रयोग बहुतेक सर्वत्र केलेला आहे.

संघाच्या पूर्वावस्थेंतील जे कागदपत्र उपलब्ध झाले आहेत, त्यांत १९२३ सालीं 'संघाच्या पहिल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिषदेंत पास झालेलें संघाचे नियम ' हा मथळा देऊन छापलेल्या नियमावलीची एक प्रत आहे. संघाच्या या घटनेंत (नियम १८) संघाच्या वार्षिक अधिवेशनास 'संमेलन' हें नांव दिलें असल्याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. त्यानंतर मात्र संघाच्या चिटणिसांनी अधिकृत रीतीने वार्षिक अधिवेशनाचा उल्लेख करितांना ' विदर्भ साहित्य संघ परिषद ' असें जरा लांबट नांव योजिलेलें दिसतें. घटनेंतील नियमाशीं होणाऱ्या विसंगतीची पदाधिकाऱ्यांनी कशी वासलात लाविली होती, हें समजत नाही. वृत्तपत्रकार व इतर तिऱ्हाईत लोक यांनी अधिकृत नामनिर्देशाची फारशी पर्वा न करितां ' विदर्भ साहित्य संमेलन ' हेंच नांव अधिक पसंत केलेलें दिसतें. ' संमेलन ' हाच शब्द सर्वत्र रूढ व सर्वांच्या फार सवयीचा झाला आहे, हें लक्ष्यांत घेऊनच की काय, संघाच्या नव्या घटनेंत वार्षिक अधिवेशनास संमेलन हेंच नांव कायम केलें आहे.

असो. कै. यादव माधव काळे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनांत (परिषदेंत) मध्यप्रांत सरकारने दुय्यम शाळांमधून इंग्रजीखेरीज इतर विषय देशी भाषांच्या द्वारें शिकविण्याची पद्धत वैकल्पिक रीत्या सुरू केली याबद्दल एका ठरावाने सरकारचें अभिनंदन करण्यांत आलें. दुसऱ्या एका ठरावाने नागपुरास विद्यापीठ स्थापन झाल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यांत आलें असून या विद्यापीठाच्या " अभ्यासक्रमांत प्रथमपासून अखेरपर्यंत मराठी भाषा व वाङ्मय यांचा समावेश करून त्यांच्या अध्यापनाची तरतूद करावी, " अशी मागणी करण्यांत आली आहे. निजाम सरकारच्या राज्यांत दुय्यम शिक्षण मराठीच्या द्वारा देण्याची सोय नाही, ती करण्यांत यावी, अशी मागणी करणारा ठरावहि मंजूर करण्यांत आला.

पुढचें १९२५ साल सुनें जाऊन संघपरिषदेचें तिसरें अधिवेशन १९२६ सालच्या प्रारंभीं (ता. १७ व १८ जानेवारी रोजीं) यवतमाळ येथे भरलें. रा. न. चिं. केळकर हे अध्यक्ष व रा. अणे हे स्वागताध्यक्ष, असा योग लाभल्यामुळे हें अधिवेशन चांगलेंच गाजलें. अध्यक्षांचें सुबोध व रसाळ भाषण, वाङ्मयरसिकांची मार्मिक चर्चा व कविवृंदाचें भरगच्च काव्यगायन यांमुळे खरोखरीच्या मेजवानीबरोबरच वाङ्मयात्मक मेजवानीचाही आनंद सभासदांना लुटावयास मिळाला.

या अधिवेशनांतील ठरावांमध्ये बरेंच नावीन्य व वैचित्र्य होतें. वैदर्भी भाषेंत रूढ असलेल्या शब्द-प्रयोगांचा व भाषाप्रयोगांचा लेखकांनी शक्य तो आपल्या लेखनांत उपयोग करावा, अशा आशयाचा एक ठराव मंजूर झाला. निजाम इलाख्यांतील शिक्षण-क्रमांत मराठीला योग्य स्थान नसल्याबद्दल तक्रार करणारा ठराव तर आता कंटाळी स्वरूपाचाच होऊन बसला होता. अर्थात तो मंजूर झालाच. देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्याचा उपक्रम सरकारने सुरू केला असतांहि कांही शाळानी तें माध्यम सोडून पुनः इंग्रजीचा अवलंब केला, याबद्दल खेद व्यक्त करून मातृभाषेचें माध्यम पुनः सुरू करण्याची शिफारस करणारा एक ठराव आणि संघाच्या प्रत्येक सभासदाने व मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्याने आपला सर्व व्यवहार मराठींतूनच करावा, अशा आशयाचा दुसरा ठराव, हे दोन ठराव आपल्या समाजांतील सुशिक्षितांच्या मनोवृत्तीवर प्रकाश पाडणारे म्हणून लक्ष्यांत ठेवण्याजोगे आहेत.

चौथें अधिवेशन भागानगर—अर्थात दक्षिण हैदराबाद—येथे १०, ११ जून १९२७ या तारखांस भरलें. अध्यक्षस्थानीं कै. चिंतामणराव वैद्य यांची योजना झालेली असून स्वागताध्यक्ष अर्थात न्या. केशवराव कोरटकर हे होते. चिंतामणराव वैद्यांनी आपल्या भाषणांत विदर्भ शब्दाची इतिहासकाळांतील व्याप्ति, विदर्भाचा जुना इतिहास, विदर्भांतील जुन्या संत कवींमध्ये दिसून येणारें वैदर्भी शैलीचें वैशिष्ट्य, इत्यादि विषयांचा अधिकारवाणीने ऊहापोह केला. या संमेलनांतील ११ ठरावांपैकी ६ ठराव निजाम इलाख्यांतील साहित्य, शिक्षण, मतस्वातंत्र्य, वाङ्मयप्रसार इत्यादि बाबतींसंबंधाचें दुखणें वेशीवर टांगणारे होते. मराठी व इतर देशी भाषांची गळचेपी, शिक्षण क्षेत्रांत त्यांना असलेला मज्जाव, अनेक विख्यात वृत्तपत्रें व पुस्तकें यांना असलेली बंदी—इत्यादि अनेक जाचक गोष्टी या ठरावांतून पुढे मांडण्यांत आल्या आहेत. विदर्भांतच रूढ असलेले शब्द व वाक्प्रचार लेखनामध्ये उपयोगांत आणण्याची शिफारस करणारा ठराव याहि संमेलनांत पुनः मंजूर करण्यांत आला.

संघाने 'विदर्भा'च्या केलेल्या व्याख्येस अनुसरून संघाच्या परिषदेला निजामच्या राज्यांत नेल्यानंतर तिला खानदेशांतून फिरवून आणणें क्रमप्राप्तच होतें. परिषदेचें पांचवें अधिवेशन जळगाव (पू. खा.) येथे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ता. २५ व २६ नोव्हेंबर १९२८ रोजीं भरलें. अध्यक्ष न्या. केशवराव व स्वागताध्यक्ष कै० के. म. सोनाळकर हे होते. अध्यक्षांनी आपल्या भाषणांत मुख्यतया निजाम इलाख्यांतील केविलवाण्या स्थितीचें विवरण केलें. महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाने केलेल्या ठरावांपैकी जे ठराव योग्य वाटतील, त्यांना पाठिंबा देण्याचा अगर त्यांचा अनुवाद करण्याचा एक नवाच उपक्रम या वर्षी परिषदेने केलेला दिसतो. एप्रिल १९२८ त ग्वालेर येथे भरलेल्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांत मंजूर झालेल्या शुद्धलेखन विषयक ठरावास या परिषदेने आपला पाठिंबा दिला व जप्त झालेलें वाङ्मय मुक्त करण्यासंबंधीच्या ठरावाचा अनुवाद केला. मंजूर झालेल्या स्वतंत्र ठरावांमध्ये, मराठी ट्रेनिंग कॉलेजांतून बंद केलेला संस्कृतचा अभ्यासक्रम पुनः सुरू करण्याची मागणी करणारा, सर्वस्वी मुंबई इलाख्यास लागू पडणारा, एक ठराव आहे. हा ठराव संघाच्या कार्यक्षेत्रांत येतो की नाही, याचा विचार करण्याजोगा आहे. उल्लेख करण्याजोगा आणखी एक ठराव, "वि. सा. संघाने खानदेशाच्या इतिहासाचीं साधनें प्रकाशित करण्याचें काम हातीं घ्यावें" हा होय. हीं साधनें तपासून, संपादून प्रकाशनासाठी तयार करण्याकरितां रा. भट, देव प्रभृतींची एक वजनदार समिति नेमण्यांत आली. प्रचलित पुस्तकी भाषेंत नसलेले, परंतु विदर्भांत सर्वसामान्य व शिष्टसंमत असलेले शब्द व वाक्प्रचार विदर्भीय लेखकांनी व वक्त्यांनी उपयोगांत आणावे, अशा आशयाचा ठराव मागील अधिवेशनांप्रमाणे याहि अधिवेशनांत मंजूर झालाच.

पुढच्या वर्षी नागपूर येथे भरणाऱ्या संघाच्या सहाव्या परिषदेसाठी निबंधाचे जे विषय जाहीर केले होते त्यांत 'विदर्भी (नागपुर-वऱ्हाडी) मराठीची शिष्टभाषा होण्याची पात्रता' असा विषय ठेवण्यांत आला होता. या विषयास अनुलक्षून रा. वामन नारायण देशपांडे, प्रि. श्री. ल. पांढरीपांडे प्रभृति विचारवंत तरुणांनी 'महाराष्ट्र'. पत्रांत लेख लिहून, सर्वत्र प्रचलित असलेली ग्रंथगत मराठी हीच शिष्टभाषा होऊं शकते, प्रादेशिक बोलींना या पदवीला चढविण्याचा खटाटोप करणें हानिकारक होईल, ही विचारसरणी निर्भीडपणें प्रतिपादन केली.

संघाची सहावी परिषद् (संमेलन) नागपूर येथे वेंकटेश थियटरांत ता. ७, ८ सप्टेंबर १९२९ या दिवशीं भरली. अध्यक्ष कै. दादासाहेब खापर्डे व स्वागताध्यक्ष विद्याभूषण रा. कृष्णशास्त्री घुले होते. अध्यक्षांनी आपल्या मार्मिक, पण मर्मभेदी नव्हे, अशा भाषणांत संघविरोधी विचारसरणीचा समाचार घेतला! त्यांचें एकंदर भाषण त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें नर्मविनोदयुक्त व जुन्या साहित्यशास्त्रीय सिद्धांतांस अनुसरणारें असें होतें.

नागपूरच्या या संमेलनांत ठरावांची संख्या विसांवर गेली. संमेलनांतील ठरावांची संख्या हें जर कार्यविस्ताराचें गमक मानलें, तर हीं सहा वर्षे संघाचें कार्य एकसारखें विस्तार पावत गेलें, असें म्हटलें पाहिजे! संघाच्या पहिल्या परिषदेंत (१९२३) तीन किंवा चार ठराव झाल्याची माहिती मिळते. हे ठराव संघस्थापना, संघाची घटनानिर्मिति वगैरे स्वरूपाचेच होते. सामान्य सार्वजनिक स्वरूपाचे ठराव दुसऱ्या (१९२४) परिषदेपासून मंजूर व्हावयास सुरवात झालेली दिसते. दुसऱ्या परिषदेंतील संख्या पांच होती. यवतमाळ येथील तिसऱ्या अधिवेशनांत नऊ ठराव झाले, तर हैद्राबाद येथील चौथ्या अधिवेशनांत (१९२७) बारा ठराव करण्यांत आले. जळगाव येथील पांचव्या अधिवेशनांत ठरावांची संख्या १४ झाली, तर नागपूर येथील सहाव्या अधिवेशनांत ही संख्या विसांवर गेली!

या सहा वर्षांत संघाने स्वतःसाठी आखून घेतलेल्या प्रदेशाच्या भिन्नभिन्न विभागांत संघाचें अधिवेशन फिरलें, किंवा फिरविण्यांत आलें. वऱ्हाड खेरीज मराठवाडा (निजाम इलाखा), खानदेश व मराठी मध्यप्रांत या तीन विभागांतील प्रमुख शहरीं संघ परिषदांचीं अधिवेशनें भरविण्यांत आलीं. अशा रीतीने सर्वत्र फिरून आल्यानंतर पुनः वऱ्हाडांत आपल्या मूळ घरीं, म्हणजे उमरावतीला, परिषदेने जाणें एका रीतीने क्रमप्राप्तच होतें. नागपूरच्या अधिवेशनानंतर उमरावतीनेच परिषदेस निमंत्रण दिलें होतें. परंतु उमरावतीस जाऊन माहेरवासाने अधिक पुष्ट होण्याच्या ऐवजी परिषद् मध्येच अंतर्धान पावली व तिजबरोबर संघही नाहीसारखाच झाला! या चमत्काराचें मुख्य कारण संघाचे सरचिटणीस आणि त्याचे मुख्य सूत्रचालक रा. बळवंत गणेश खापर्डे हे १९३० सालापासून प्रांताबाहेर बनारस येथे राहावयास गेले, हें होय. वस्तुतः सात वर्षे व्यवस्थित चाललेली संस्था, एक कार्यकर्ता बाहेर पडल्याबरोबर लुप्तप्राय व्हावयास नको होती. परंतु असें झालें खरें! असा प्रकार झाला,

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजे फार वर्षांपूर्वी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी लिहिलेल्या 'आमच्या देशांतील सभा, संस्था व मंडळ्या' या लेखाची आठवण होते!

'विदर्भ साहित्य संघ' सात वर्षें सुप्तावस्थेंत राहिला. आठव्या वर्षी, म्हणजे १९३७ सालीं, ता. २१ व २२ ऑगष्ट १९३७ रोजीं संघाला पुनः जागृत करून संघ-परिषदेचें सातवें अधिवेशन अमरावती येथे प्रा. नरहर रघुनाथ फाटक यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आलें. स्वागताध्यक्ष प्रा. वि. भि. कोलते, कार्याध्यक्ष सौ. मधुराबाई द्रविड आणि चिटणीस रा. अ. तु. वाळके या तिघांच्या परिश्रमानेच मुख्यतया हें अधिवेशन भरलें. उद्घाटन त्यावेळचे मध्यप्रांत सरकारचे मुख्यप्रधान नामदार डॉ. ना. भा. खरे यांच्या हातून झालें. या परिषदेंत एकंदर १६ ठराव मंजूर करण्यांत आले. त्यांपैकी एक ठराव दुखवट्याचा, दोन ठराव घटनेंत बदल करणारे आणि एक ठराव कार्यकारी मंडळ नियुक्त करणारा, याप्रमाणे चार ठराव वगळले असतां बाकीचे १२ ठराव महत्त्वाच्या भाषाविषयक अथवा शिक्षणविषयक सार्वजनिक प्रश्नांसंबंधीचे आहेत. एका ठरावांत भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करण्यांत आला आहे. दुसऱ्या एका ठरावांत संघाचें मुखपत्र म्हणून एक त्रैमासिक सुरू करावें, असें म्हटलें असून तें प्रसिद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारण्याची रा. वाळके व शिदोरे यांना विनंती केली आहे.

हें अधिवेशन मोठ्या उत्साहाने भरलें खरें, परंतु पुनः मोठा खंड पडला. अमरावतीनंतर वर्ध्यास आमंत्रण देण्यांत आलें होतें. परंतु अनेक अडचणी-मुळे तें फलद्रूप होऊं शकलें नाही. अमरावती येथे कार्यकारी मंडळाची जी निवडणूक झाली होती, तींत रा. अणे अध्यक्ष व रा. वाळके हे सरचिटणीस निवडले गेले होते. संघाची सरचिटणिशी म्हणजे जणूं कांही प्रांताबाहेर जाण्याची सुपारीच ठरावी, असा त्यांच्याही बाबतींत योगायोग आला; आणि विदर्भ साहित्य संघाचें काम पुनः एकवार गळाटलें.

त्यानंतर संघाच्या कामाला चालना मिळण्याचा योग १९४४ सालीं आला. ह्या कामीं कोणी पुढाकार घेतला, संघाच्या पुनरुज्जीवनार्थ कसकसा उद्योग कर-ण्यांत आला व संघाचें आठवें संमेलन अकोट येथे ता. ३०, ३१ मार्च १९४५ रोजीं डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली कसें भरविण्यांत आलें, याचा इतिहास अगदी ताजा आहे. पूर्वी दोनदा झालें त्याप्रमाणे याहि खेपेस आरंभशूरत्वाचा दोष आपणा-वर येतो की काय, अशी धास्ती हें काम अंगावर घेणारांस वाटत होतीच. परंतु दर्यापूर येथे वाढत्या उत्साहाने ता. २३, २४ व २५ डिसेंबर १९४५ रोजीं भरलेल्या नवव्या संमेलनाने ही धास्ती निराधार ठरवून कार्यकर्त्यांना हायसें वाटावयास लावलें आहे. संघासंबंधी वऱ्हाडांत सर्वत्र चांगलाच उत्साह जागृत झालेला असून हा उत्साह सामान्य जनतेंत पसरत आहे हें फारच चांगलें लक्षण आहे, असें म्हटलें पाहिजे. पूर्वीच्या सातहि परिषदा जिल्ह्यांच्या शहरीं किंवा नागपूर हैद्रा-बाद सारख्या मोठ्या राजधानीच्या ठिकाणीं भरल्या. परंतु १९४४ च्या अखेरीस जेव्हा संघाच्या संमेलना-साठी निमंत्रणें मागविण्यांत आलीं, तेव्हा अकोट-सारख्या आडवळणाच्या तालुक्याच्या गावाचे लोक उत्साहाने पुढे झाले आणि त्यांनी अतिशय प्रेमाने व व आस्थेने विदर्भ साहित्य संघाच्या पुनरुज्जीवनाचें कार्य घडवून आणलें. ता. ३० मार्च रोजीं सायंकाळीं एलिचपूरचे श्रीमंत नारायण व्यंकटेश उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेला संघाचा पुनरुज्जीवनसमारंभ तर सर्व दृष्टींनी अपूर्व झाला. रा. पागराऊत, माधवराव आसरकर प्रभृति मंडळींनी संमेलनाच्या यशस्वितेसाठी अविश्रांत परिश्रम केले.

तात्पर्य, संघकार्याचें लोण मोठमोठ्या शहरांतून आता तालुक्याच्या गावांमध्ये जाऊन पोचलें आहे. आणि त्याच्या चिरस्थायित्वाचें हेंच मोठें लक्षण आहे. संघाची घटना आता नव्याने विस्तृत बनविण्यांत आली आहे व तरुण, उत्साही कार्यकर्त्यांचा संघाच्या कक्षेंत समावेश झालेला आहे. या सर्व लक्षणांवरून संघाचा यापुढे दिनप्रतिदिनीं विस्तार होत जाऊन मराठी भाषेच्या व साहित्याच्या जोपासनेचें साधन हें या प्रांतांतील प्रमुख साधन बनून राहील, अशी आशा वाटत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तकांचें स्त्रीत्व

शान्ताराम बी. ए.

'शांताराम' हे नागपूरचे तरुण साहित्यिक आपल्या लेखन-कौशल्याने अल्पावधींत प्रसिद्धीस आले आहेत. यांची लेखनशैली चटकदार व मार्मिक असते. प्रस्तुत ललित निबंध या विधानाची साक्ष देण्यास पुरेसा आहे.

लॉर्ड बायरनचं ज्या दिवशीं लग्न झालं, त्या दिवशीं त्याने आपल्या बायकोला विचित्र तडाखा दिला. " आता तूं माझी पत्नी आहेस. बस, तुझा तिरस्कार करायला मला तेवढंच कारण पुरेसं आहे. तेंच तूं जर दुसऱ्या कुणाची बायको असतीस, तर मात्र मी तुझ्यावर प्रेम केलं असतं."

बायरनच्या स्वभावाची कल्पना या एका प्रसंगाने येते. पुष्कळांना माणूस असा असूं शकेल काय, असा संशय येतो. पण असला संशय घ्यायचं कांही कारण नाही. खरं म्हटलं तर जें बायरनचं, तेंच तुम्हा आम्हा सगळ्याचंच असतं. हें विधान करतांना मी किती भयंकर धाडस करीत आहें, याची मला पूर्ण जाणीव आहे. सगळ्यांची प्रवृत्ति बायरनसारखी असावी, असं मी नाही म्हणणार. माझं म्हणणं अगदी साधं आहे. ज्या वस्तूसाठी आपली धडपड चालू असते, ती प्रत्यक्ष हस्तगत झाली की, तिच्याबद्दलची पूर्वीची आस्था व कुतूहल मन्दावतं. मग तिचा तुम्ही द्वेष करा किंवा करूं नका, तो तुमच्या स्वभावाचा प्रश्न आहे. ती एक तपशिलाची बाब आहे.

गांधीसारख्यांच्या आयुष्यांत स्वातंत्र्याला जें स्थान आहे, एखाद्या व्यापाऱ्याला पैसा जितका जवळचा आहे, तितकीच ' स्त्री ' बायरनला प्रिय होती. बायरनची आवड चांगली किंवा वाईट हा प्रश्न निराळा. मला त्याच्या तळमळीचा, ओढीचा विचार करावयाचा आहे. बायरनची इतकी आठवण व्हायचं कारण म्हणजे पुस्तकांबद्दल माझी वृत्ति. पुस्तकांबद्दल मला कमालीची आवड आहे, असं स्पष्टपणें सांगण्यांत मला बिलकूल संकोच वाटत नाही. जोंपर्यंत एखादं पुस्तक मला मिळत नाही, तोंपर्यंत तें मिळविण्याची माझी किती तरी धडपड चालू असते; आणि काय होतं कोण जाणे, एकदा का तें पुस्तक मला मिळालं की माझी ओढ कमी होते. म्हणूनच माझ्या संग्रहीं असलेल्या पुस्तकांना म्हणावंसं वाटतं, "झालं, संपलं तुमचं आकर्षण. तुम्हांला मिळविण्यासाठी एवढा धडपडलों, हें खरं आहे. पण त्याचं आता काय? तेंच तुमच्यावर दुसऱ्या कुणाचा हक्क असता, तर माझं मन सारखं तुमच्याभोवती रेंगाळलं असतं."

या तऱ्हेवाईक प्रवृत्तीची जबाबदारी माझ्यावर येणं साहजिकच आहे. पण ही तऱ्हेवाईक वृत्ति मान्य करूनहि मला पुस्तकांवर स्त्रीत्वाचा आरोप करावयाचा आहे. अर्थात् पुस्तकें व स्त्रिया यांत मला दिसणारं साम्य हाच एक स्त्रियांचा गुण आहे, असं मी म्हणणार नाही. परंतु इतकं नक्कीच की, पुरुष आणि स्त्री ज्या प्रकाराने जवळ येतात, त्यांत व वाचक आणि पुस्तकें यांची ज्या रीतीने गाठ पडते, तींत साम्य आहे.

शेलीच्या जीवनावरील आन्द्रे मार्वाच्या 'Aerial' या पुस्तकाचं मी नुसतं नांव ऐकलं. नुसत्या नांवाच्या जादूने मी भारून गेलों. नुसत्या नांवाने मोहित होणं ही कदाचित् दुर्बलता असेल. पण पुस्तकें मला नुसत्या नांवाने सुद्धा भारूं शकतात व तें मी टाळूं शकत नाही. तें पुस्तक मिळेपर्यंत थेट प्रियकरासारखा मी मनांतल्या मनांत म्हणूं लागलों, "कधी तरी, कुठे तरी तुझं ऐकलं मीं नांव, नकळत तुझ्या ठायीं जडला नी स्नेहभाव." आता तें पुस्तक कपाटांत धूळ खात पडलं आहे! मलपृष्ठें गळून गेल्यामुळे पंखविहीन वनदेवतेसारखी त्याची दशा झाली आहे! प्रथमदर्शनीं प्रेमाचा जो प्रकार आहे, त्याला तर पुस्तकांच्या बाबतींत मी अनेकदा बळी पडलों आहें. पुस्तकांच्या दुकानासमोरून जावं; काचेच्या कपाटांतून दिसणाऱ्या सुंदर मुखपृष्ठावर लक्ष जावं आणि खिशांत पैसे असले की, सरळ तें पुस्तक घरीं आणून पटकावं, असा प्रकार मी

कितीदा तरी केला आहे. पण आताशा मी जरा सावध होत आहें. 'प्रथमदर्शनीं प्रेम' जसं बहुधा फोल ठरतं, त्याप्रमाणेच कित्येक पुस्तकांनी मला चांगलंच बनवलं आहे. या दगाखोरीचं खापर मी स्वतःवर फोडायला तयार नाही. पुस्तकाच्या बहिरंगावर अंतरंगापेक्षा जास्त पैसा उधळण्यापर्यंत प्रकाशकांची सौंदर्यदृष्टि जेऊन थडकल्यावर माझ्यासारखा मासा गळाला लागला, तर आश्चर्य काय? असली फसगत पुस्तकांच्याच बाबतींत झाली, हें आपलं नशीब समजावं! कित्येकदा प्रेमाचा प्रादुर्भाव 'केला जरी पोत बळेंचि खाले' या न्यायाने होतो. नाही तर, रेनॉल्डसच्या कादंबऱ्या मी कशाला वाचल्या असत्या? इंग्रजी चवथींत आम्हांला नारायण हरि आपट्यांची 'सुखाचा मूलमंत्र' ही व्यायामप्रचारक कादंबरी होती. त्यांतील मुकुंदा, की कोणी तरी, रेनाल्डसच्या कादंबऱ्या लपून वाचतो, असा उल्लेख आहे. तें वाचतांच माझं कुतूहल भडकलं व मी त्या वाचून काढल्या. त्यावेळीं रेनाल्डसची भाषा मला काय समजणार? लगेच मी नाथमाधवांचीं पुस्तकें वाचून ही उणीव भरून काढली. यापेक्षा निराळा प्रकार मार्क्सच्या बाबतींत झाला. मार्क्सचे विचार समजण्याइतकी माझी तयारी झाली नसूनहि लहान तोंडीं मोठा घास घ्यायचा मोह मी टाळूं शकलों नाही. आपले परिचित किंवा मित्र एखाद्या व्यक्तीबद्दल फार फार चर्चा करूं लागले की, ऐकीव स्तुतीचा मनावर असा जबरदस्त दाब बसतो की, ती व्यक्ति मनांतून काढतां येत नाही. मार्क्सशीं मी झोंबी घेतली, ती अशाच प्रकारें. जगांत अशा व्यक्ति फारच थोड्या की, ज्या आपण होऊन अधःपतनाला तयार होतील. त्याचप्रमाणे, स्वतः होऊन माझ्याकडे किंवा कुणाकडे येणारीं पुस्तकेंहि कमीच. तरी पण तशाहि प्रकारचीं उदाहरणें अगदीच नाहीत, असं नाही. कांही पुस्तकांच्या बाबतींत सनातनी लग्नासारखी भानगड घडते. घरच्या वडील मंडळींनी उपवधू मुलाला म्हणावं, "ही बघ तुझ्यासाठी पसंत केलेली मुलगी. हिच्याशीं तुला संसार करायचा आहे." व मुलाने निमूटपणें तें मान्य करावं, असला प्रकार विद्यापीठाने नेमलेल्या पुष्कळशा पुस्तकांच्या बाबतींत होतो. असल्या लग्नाचा परिणाम व्हायचा तोच होतो. माणूस जसा बाहेर फटकतो, तसा विद्यार्थी प्राध्यापक क्रमिक पुस्तक शिकवीत असतां आपलं एखादं आवडतं पुस्तक शेवटच्या बाकावर बसून रंगांत वाचत असतो. 'संपूर्ण शॉ' किंवा 'संपूर्ण शेक्सपीअर' हीं लाल किंवा निळ्या जाड पुठ्ठ्यांचीं, सोनेरी अक्षरांत चमकणारीं पुस्तकें आणि थोरामोठ्यांच्या बायका यांची अवस्था मोठी केविलवाणी असते. वर्षानुवर्षे एकमेकांचं तोंड न पाहतां थोर पतिपत्नी आपले व्यवहार करीत असतात आणि एखाद्या दिवशीं मित्रांचं सम्मेलन असलं किंवा एखादा बडा पाहुणा घरीं आला असला, की, एकमेकांच्या गुणाचं वर्णन, एकमेकांच्या सहवासांत मिळालेल्या आनंदाचं रसभरित कथन वगैरे गोष्टी त्या थोर पतिपत्नींना करणं भाग पडतं. मित्र किंवा बडा पाहुणा निरोप घेतांना त्यांना धन्यवाद देतो, "मोठी सुखी जोडी आहे, बुवा, तुमची." त्याच वेळीं काय ती कित्येक वर्षांनंतर त्या थोर जोडप्यांत खऱ्या प्रेमकटाक्षांची देवघेव होते. त्यानंतर पुन्हा शांतता व परस्पराचे व्यवहार एकमेकांकडे लक्ष न देतां पूर्ववत् चालू. 'समग्र क्ष' आणि 'समग्र य' पुस्तकें पुष्कळांच्या कपाटांत दिसतात, तीं मित्रांच्या, "खरंच तुमची पुस्तकांची आवड वाखाणण्याजोगी आहे, बुवा"—या स्तुतीसाठीच.

पुस्तकांना आपण जखडून ठेवायचा प्रयत्न केला, तरी त्यांची प्रवासाची सवय आपण नष्ट करूं शकत नाही. पुस्तकें एकदा प्रवासाला निघालीं की, तीं कुठे जातील, कुठे थांबतील, मूळ ठिकाणावर परत येतीलच की नाही, वगैरे बाबतींत कसलीच हमी देतां येत नाही. पूर्वी घरची कांही मंडळी यात्रेला निघाली की, अश्रु व किंकाळ्या यांनी त्यांना निरोप दिला जाई. यात्रेला निघालेली व्यक्ति परत आली, तरच नवल, हें रडणाऱ्याला ठाऊक असायचं. त्यामुळे त्या आरडाओरडींत भावनेपेक्षा पुष्कळदा रूढीचाच भाग अधिक असायचा. तसंच; आपलं एखादं पुस्तक प्रवासाला निघालं व प्रवासालाच पचलं, तर आपण हळहळतों, पण तें केवळ कर्तव्यभावनेनेच. त्याचं विशेष कांही कुणी लावून घेत नाही. पण गेलेल्या प्रेमसंबंधाची उणीव भरून काढण्याचा मानवी प्रयत्न सदोदित चाललेला असतो. बाकी, कधी कधी मोठी गंमत होते. दुसऱ्याची स्त्री जाळ्यांत अडकणार, या आनंदांत असणाऱ्या फाल्गुनरावांना शेवटीं मिळते ती स्वतःचीच बायको कृत्तिका. पुस्तकांच्या बाबतींत हा अनुभव तर नेहमीच मिळतो!

ईश्वराच्या अगाध सृष्टींतील स्त्री व पुस्तक या दोन कलाकृति एकमेकांपासून निराळ्या असल्यामुळे त्यांच्यांत भेद असणारच. स्त्री सजीव व पुस्तक निर्जीव हा भेद

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ शाब्दिक आहे. पुस्तकांहून निर्जीव अशा कांही व्यक्ति असतातच की ! माझ्या दृष्टीने—या लेखाच्या दृष्टीने—खरा भेद आहे, तो दुसरीकडेच. स्त्रियांच्या बाबतीत एकपत्नीव्रत जितकं चांगलं तितकंच एकपुस्तकव्रत वाईट असतं. जगांतले बहुतेक अनर्थ एकपत्नीव्रताचा सपशेल भंग व एकपुस्तकव्रताचं कडक पालन यामुळेच घडून आले आहेत. पुस्तकांबाबत भ्रमरवृत्तीसारखी आल्हाददायक दुसरी कोणतीच वृत्ति नाही.

आपल्या मालकीच्या पुस्तकांवरून उडून दुसऱ्याच्या पुस्तकांवर आपलं प्रेम का जावं ? पुस्तक आपलं झालं, म्हणजे त्याचं निकटदर्शन शक्य होतं. हें निकटदर्शन टीकाकाराला अवश्य असलं तरी सर्वसाधारण वाचकाला कंटाळवाणंच होतं. रसिकतेत थोडासा आंधळेपणा, थोडासा अपुरेपणा, थोडंसं अंतरामुळे निर्माण झालेलं आकर्षण, थोडीशी ओढ हवी. पुस्तक स्वतःचं झालं की, हें कसं जमणार ? मग भूमिका रसिकाची रहात नाही. ती डोळस टीकाकाराची भूमिका असते. पति हा पत्नीचा आद्य टीकाकार असतो, तें याचमुळे. बायरनचं वर्तन दुष्ट आहे, हें खरं; पण "तुझ्यामुळे माझ्या जीवनाचा सत्यानाश झाला," असं म्हणणारे नवरे—आणि ते कमी नाहीत—खचित वाईट नाहीत. त्यांची चडफड म्हणजे 'तोचतोपणांतून' सुटण्याची एक उलटी धडपड असते.

माझ्या या विचारांमुळे ग्रंथांच्या 'अक्षरत्वा' वर घाला पडेल, ही भीति मला नाही. कुणाचा तसा गैरसमज झाला, तर माझं म्हणणं त्याला बिलकूल कळलं नाही. अशा लोकांसाठी हें लिहिलंच नाही मुळी. पुस्तकांचं अमरत्व व्यक्तीव्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यावर अवलंबून नसतं. एकाच व्यक्तीच्या जीवनांतील दोन क्षणांवर पुस्तकांचं अमरत्व विसंबून नसतं. व्यक्तीव्यक्तीच्या सामान्य क्षणांनी तयार झालेलं व सारखं वाढणारं असं जें पुस्तकांचं वय, तेंच त्याचं अमरपण.

बायरनचं उदाहरण पटत नसलं, किंवा परकं वाटलं, तर श्रीकृष्णाचं उदाहरण घ्या. श्रीकृष्णाला सोळा हजार की कायशा बायका होत्या म्हणे. ज्या कवीने श्रीकृष्णाचं सोळासहस्र स्त्रियांशीं लग्न लावून दिलं, त्याची देखील अपेक्षा नसेल की, त्यानं सर्वांवर प्रेम करावं. खास प्रीति मिळाली, ती रुक्मिणी आणि भामेलाच. इतरांची गत बायरनच्या बायकांसारखीच असणार. माझ्या मालकीच्या पुस्तकांची संख्या श्रीकृष्णाच्या बायकांएवढी कधीच भरणार नाही. पुस्तकांचं दुकान काढलं, तरी सोळा हजार पुस्तकांची मालकी मला लाभायचा संभव नाही. संख्येचं काय ? आहे त्या संख्येंतच मी सांगितलेला प्रकार घडतो; ही साक्ष वाचक स्त्रीपुरुष देतील. स्त्रियांनी थोडं तारतम्य ठेवून माझी कैफियत वाचली व तिला 'पुस्तकांचें पुरुषत्व' हें नांव दिलं की त्यांचंहि काम भागेल, अशी आशा आहे.

गुप्त सरस्वती

१ कै. गो. ग. आगरकर
२ कै. रा. वि. महाजनी

या सदरांत साहित्यिकांचीं अगर साहित्यिकांचा संबंध असलेलीं खाजगी पत्रें दिलीं जातील. खाजगी पत्रांतून साहित्य व साहित्यिक यांजवर प्रकाश पडणारा मजकूर पुष्कळदा असूं शकतो.

(१)

कै. गोपाळ गणेश आगरकर यांचें कै. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस पत्र

[मूळ पत्र इंग्रजींत असून त्याचा स्वैर अनुवाद पुढे दिला आहे.]

प्रिय अण्णासाहेब, पुणें, ३ मार्च १८९१.

तुमच्या मागील पत्रांतील आपुलकीच्या प्रेमळ उद्गारांबद्दल मी तुमचे पुरेसे आभार मानूं शकत नाही. त्या पत्राने मला शांति मिळाली. 'सुधारकां'त प्रसिद्ध होणाऱ्या मतांबद्दल स्थानिक व प्रांतिक वर्तमानपत्रें गेलीं दोन वर्षें मला किती तरी गालिप्रदान करीत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेत, याची तुम्हांस क्वचितच कल्पना करतां येईल. तुम्ही पत्रांत उल्लेखिलेल्या लेखाबाबत भाऊंचें (?) काय मत पडेल यासंबंधीं तुम्ही जो अंदाज केला होता, तो अक्षरशः खरा ठरला आहे. ते आपल्या २५-९-९१ च्या कार्डांत लिहितात :—

† "अलीकडे पांचचार अंकांत आपलीं 'आर्टि-कलें' पाहून बरें वाटत होतें; परंतु कालचे अंकांतील अनावृत पत्र पाहून फार संतोष वाटला. 'आर्टिकल' फार चांगलें, मनोवेधक आणि यथार्थ आशयाचें आहे. याच अंकांत 'निःशंक उत्तर' म्हणून पत्र आहे, तेंहि चांगलें लिहिलेलें आहे."

मी तुम्हांस सांगूं इच्छितों कीं, 'निःशंका'चें हें पत्र पंडिता रमाबाई यांच्या लेखणींतून उतरलें आहे; आणि गेल्या अंकांतील 'शंकित' या सहीचें पत्र नामदार न्या. मू. तेलंग यांच्या लेखणींतून उतरलें आहे.

संमतिवयाच्या कायद्यासंबंधींच्या वादाबद्दल आणि शाळा व कॉलेज यांच्यासंबंधींच्या प्रकरणांबद्दल मला तुम्हांला किती तरी गोष्टी सांगावयाच्या आहेत. सर्व-साधारण पत्राच्या मर्यादेंत त्या मांडावयास मी असमर्थ आहें. यामुळे आपल्या भेटीच्या दिवसाकडे मी आशेने व उत्कंठेनें डोळे लावून बसलों आहें.

वऱ्हाडांत मी कधीं काळीं लांबलचक मुक्काम करूं शकेन, असें मला वाटत नाहीं. डॉक्टरांच्या सांगण्या-वरून मला असें वाटतें कीं, दरवर्षी पुण्याबाहेर जाऊन कोरड्या व अधिक निरोगी हवेंत कांहीं महिने काढावे. वऱ्हाडांत हें जुळूं शकणार नाहीं. कामका-जाच्या केंद्रापासून तें लांब आहे. माझे हवा पालट-ण्याचें ठिकाण पुण्यापासून फार दूर नसलें पाहिजे! वर्तमानपत्र प्रसिद्ध होण्याच्या दिवशीं मला पुण्यास परत जातां आलें पाहिजे. गतवर्षीच्या अनुभवावरून मला महाबळेश्वर सुद्धा फार लांब वाटलें. येता उन्हाळा * * * येथें काढण्याचा विचार आहे. हें सोलापूरच्या बाजूचें खेडें असून पुण्यापासून २५-३० मैलांवर आहे आणि आगगाडीनें तेथें जाण्यास सुमारें एक तास लागतो. तेथें माझ्या एका मित्राचा बगीचा असून बगीच्यांत एक लहान घर आहे. त्याचा उपयोग करूं देण्याचें मित्राने कबूल केलें आहे. डॉक्टर्स म्हणतात कीं, दमेकऱ्यास हें ठिकाण फार चांगलें आहे. या वर्षी मी तेथें जाईन म्हणतों.

...आम्हांला जानेवारी, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल आणि जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांत फार परिश्रम होतात. आता पत्र पुरे करणें भाग आहे. कारण उद्याच्या वर्गासाठी बर्कच्या पुस्तकाची तयारी करावयाची आहे.......

तुमचा स्नेहांकित
गो. ग. आगरकर.

† हें अवतरण मराठींतच आहे.

* येथे अक्षरें कागद फाटल्याने लागली नाहींत.

(२)

कै. रामचंद्र विष्णु महाजनी यांचें कै. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस पत्र

[अकोल्याचे सुप्रसिद्ध नेमस्त पुढारी कै. रामचंद्र विष्णु महाजनी यांनी हें पत्र आपले वडील कै. वि. मो. महाजनी यांस मराठींत लिहिलें होतें. मराठींत पत्र लिहिल्याबद्दल त्यांनी आरंभीं केलेलें आत्मसमर्थन पाहण्याजोगें आहे!]

डेक्कन कॉलेज, पुणें, २ मार्च १८९४

ती. रा. रा. अण्णा यांस कृ. सा. न. वि. वि.

...आज हें पत्र मी मराठींत लिहीत आहें, ह्या-बद्दल आपणांस आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. प्रो. आबासाहेब काथवटे ह्यांना हरिमामांस मराठींत पत्र लिहितांना पाहिलें होतें व त्याचप्रमाणे येथे कॉलेजांत एक जण आपल्या मित्रास मराठींतच पत्र लिहीत असतो. सबब मलाहि एकवार मराठींत पत्र लिहि-ण्याची इच्छा झाल्यावरून ती आज पुरवीत आहें....

रा. रा. टिळक व आगरकर ह्यांना युनिव्हर्सिटीचे फेलो नेमल्याबद्दल त्यांना पानसुपारी करण्याचा येथील कित्येक मंडळीचा विचार आहे. सबब दोघांस बोलावण्याकरतां मी व दुसरा एक असामी गेलों होतों. परंतु ते पानसुपारीस येण्यास बरेच नाखूष आहेत असें दिसलें. तथापि बराच आग्रह केल्यावरून दोन तीन दिवसांत उत्तर धाडतों, असें म्हणाले. परंतु अद्याप कांहीं एक उत्तर आलें नाहीं.

रा. टिळक व रा. आगरकर ह्यांचा समेट झाल्याचें ऐकून फार आनंद झाला. युनियन क्लबमध्ये पान-सुपारी झाली त्यावेळीं रा. आगरकर ह्यांनीं समेट झाल्याबद्दल बोलून दाखविलें. सामाजिक सुधारणेच्या पक्षास दोघांचीहि जरूरी आहे. आगरकर हे आग-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गाडीच्या एंजिनाप्रमाणे असून त्यांची गति सदा पुढे असते व रा. टिळक हे ब्रेकप्रमाणे असून ह्यांचा गति थांबविण्याचा प्रयत्न चालला असतो....

आता लौकरच युनि० च्या सेनेटपुढे उच्च प्रतीच्या परीक्षांतून देशी भाषा हा क्रमिक विषय करण्यासंबंधाने प्रश्न निघणार आहे...आगरकर ह्यांचें म्हणणें असें आहे की, इंग्रजी खेरीजकरून बाकी सर्व विषयांचीं उत्तरें विकल्पाने मराठींत देत जावीं, असा नियम घातला, म्हणजे मराठी भाषा व इतर भाषा आपोआप सुधारतील. कारण त्या त्या भाषांतून निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ लिहिले जातील. ही सूचना अंमलांत आणण्यास बरेंच कठीण जाईल. ह्यापेक्षा रा. टिळक ह्यांची सूचना अंमलांत आणणें जास्त सुलभ जाईल. त्यांची अशी सूचना आहे की, पी. ई. ला इतिहासाचा कागद देशी भाषांतूनच लिहून घेत जावा. तो विषय वाटेल तर क्रमिक इंग्रजी पुस्तकावरूनच शिकवावा. इंग्लंडमध्येंहि कांही विषयांसंबंधाने हीच पद्धत चालू आहे. आरिस्टॉटल, प्लेटो ह्यांचे मूळचे ग्रंथ वर्गांतून वाचून त्यांतील प्रश्नांचीं उत्तरें मात्र इंग्रजींत द्यावीं लागतात.

...कळावें, श्रुत होय ही विज्ञापना.

आपला,

रा. वि. महाजनी.

टीपः—वरील दोन्ही पत्रें रा. द. वा. महाजन, तहसीलदार, यांजमार्फत मिळालीं.

संपादकीय

विदर्भ-साहित्य-संघाचें प्रकाशन म्हणून 'युगवाणी'चें हें प्रथम पुष्प उशिरा कां होईना, वाचकांच्या हातीं देण्याचा सुयोग येत आहे, याबद्दल विदर्भ-साहित्य-संघाच्या कार्यकारी मंडळाला—व व्यक्तिशः मला—फार समाधान वाटत आहे.

'युगवाणी' विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र म्हणून प्रसिद्ध होत आहे. विदर्भ-साहित्य-संघाचा प्रथम पासूनचा इतिहास या पुष्पांत अन्यत्र स्वतंत्र लेखरूपाने देण्यांत येत आहे, त्याकडे मी वाचकांचें लक्ष्य वेधूं इच्छितों. संघाच्या कार्यकारी मंडळाने मासिक काढण्याचें ठरवून त्याचा संपादक म्हणून माझी निवड केली आणि मीहि हें काम एक वर्षभर निवेतन करण्याचें पत्करलें. 'युगवाणी'चा प्रथमांक नोव्हेंबर १९४५ च्या सुमारास—म्हणजे गेल्या दिवाळींत—निघण्याचें ठरलें होतें. परंतु हिंदुस्थान सरकारकडून कागदाचा 'वाटा' (Quota) मिळण्यास अतोनात विलंब झाल्याने प्रथमांक अनपेक्षित लांबला! या विलंबास कुणाचाच उपाय नसल्याने वाचकांनी त्याबद्दल क्षमा करावी, अशी विनंति आहे. आता, प्रथमांकाऐवजी हें पुष्प प्रसिद्ध होत आहे. पुढील खेपेस 'युगवाणी' मासिक या नात्याने रीतसर सुरू होईल व तिचा तो अंक दुसरा अंक म्हणून गणला जाईल. आजचें पुष्प हें वर्गणीदारांस प्रथमांकादाखल विनामूल्य मिळेल.

विदर्भ-साहित्य-संघाचें वर्ष जानेवारी ते डिसेंबर असें समजण्यांत येतें. यामुळे 'युगवाणी'चा वर्षारंभहि जानेवारीपासून धरणें क्रमप्राप्त होतें. जानेवारीचें हें पुष्प एप्रील मध्ये निघत आहे, हा प्रकार सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल खरा; पण सरकारचा दीर्घसूत्रीपणा व संघाची घटना यांच्यामुळे तसें करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. डिसेंबर १९४६ अखेर वाचकांना जानेवारीच्या या पुष्पा सुद्धा 'युगवाणी'चे एकूण बारा अंक मिळतील, याबद्दल त्यांनी खात्री बाळगावी. या पुढील कांही अंक तातडीने काढण्यांत येऊन लौकरच प्रत्येक अंक त्या त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्यांत येईल, एवढेंच तूर्त मी म्हणतों.

'युगवाणी'चें स्वरूप

वऱ्हाड–मध्यप्रांतांत सध्या वाङ्मय विषयास वाहिलेलें एकहि मराठी मासिक नाही. ही उणीव दूर करण्यासाठीच वि. सा. संघाने 'युगवाणी' मासिक सुरू करण्याचें ठरविलें आहे. हें मासिक संघाच्या धोरणाला अनुसरून असेंच चालविलें जाईल. संघाचें धोरण प्रथमपासून मराठी भाषा व मराठी साहित्य यांची

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
अनुक्रमणिका
विदर्भ साहित्य संघ

अभिवृद्धि करण्याचें आहे. अर्थात् 'युगवाणी'चेंहि तेंच धोरण राहील, हें उघड आहे. तसेंच, हें धोरण अमलांत आणतांना, वि. सा. संघाप्रमाणेच, 'युगवाणी' मासिकहि प्रांतीयता व जातीयता यांच्यापासून सर्वस्वी अलिप्त राहील. 'युगवाणीं'त कसल्याहि संकुचितपणाला कदापि थारा मिळणार नाही, याची वाचकांस मी खातरजमा देतों. 'युगवाणी'ला विदर्भांतील साहित्यिकांप्रमाणेच विदर्भाबाहेरील साहित्यिकांचेंहि लेखन-साहाय्य मिळालें आहे व मिळणार आहे, एवढें म्हटलें, म्हणजे तिचें धोरण व्यापक असल्याबद्दल कुणासच संशय राहणार नाही.

'युगवाणी'चें धोरण

'युगवाणीं'त ललित व गंभीर असें उभयविध लिखाण येत जाईल. तसेंच; तिच्यांत मजकुराची विविधताहि भरपूर राहील. (१) कविता (२) साहित्यिकाचा परिचय (३) प्रबंध (४) ललित वाङ्मय व (५) विविध—एवढीं सदरें 'युगवाणीं'त येत जातील. 'साहित्यिकाचा परिचय' हें 'युगवाणी'चें खास सदर आहे. त्यांत विदर्भांतील—व विदर्भाबाहेरीलहि—थोर थोर साहित्यिकांच्या वाङ्मयीन कार्याचा, त्यांच्या जीवनचरित्रासह, परिचय करून देण्यांत येईल. शेवटल्या सदरांतील 'ओझरतें दर्शन' (परभाषांतील नवीन किंवा श्रेष्ठ कृतींचा कलात्मक परिचय) व 'गुप्त सरस्वती' (साहित्यिकांचीं वाङ्मयविषयक पत्रें) हीं दोन अंगें वाचकांस खात्रीने मनोरंजक वाटतील. याशिवाय योग्य कालीं इतरहि सदरें चालू करण्यांत येतील.

मराठींतील लघुकथा दिवसेंदिवस 'तंत्र' दृष्ट्या अधिकाधिक शिथिल होत आहे. ही गोष्ट अप्रिय वाटली, तरी पण सत्य आहे. तिला आळा घालण्याचा एक नम्र प्रयत्न म्हणून 'युगवाणीं'त परभाषांतील उत्तमोत्तम लघुकथांचा अनुवाद प्रसिद्ध करण्यावर अधिक भर देण्याचें मी ठरविलें आहे. भाषांतरित कृतीला नाक मुरडणारे कांही 'शालशिष्ट' आहेत, हें मी जाणतों. पण कार्याचें महत्त्व जाणून त्यांच्या टीकेकडे दुर्लक्ष्य करणेंच श्रेयस्कर आहे! खेरीज, अनुवादाचें स्वतंत्र महत्त्व हें आहेच, याची विद्वानांस तरी जाणीव करून द्यावयास नको.

वाचकांस विनंती

विदर्भ-साहित्य-संघाने 'युगवाणी' सुरू करण्याचें ठरवून स्वतःवर मोठीच जबाबदारी घेतली आहे. ती पार पाडण्यास तो समर्थ व्हावा, यासाठी वाचकांनी संघाचे पहिला वर्ग सदस्य होऊन किंवा मासिकाची वार्षिक वर्गणी भरून सक्रिय सहानुभूति दर्शविली पाहिजे. पुरेशा लोकाश्रयाच्या अभावीं 'वागीश्वरी,' 'विहंगम,' 'विश्ववाणी,' यांसारखीं उच्च प्रतीचीं मासिकें अकालीं अस्तंगत झालीं. ती आपत्ति 'युगवाणी' वर येऊं द्यावयाची की काय, हें वाचकांनीच ठरवावयाचें आहे!

आभारप्रदर्शन

'युगवाणी'स सरकारी परवानगी मिळविण्याबाबत नामदार डॉ. ना. भा. खरे, रा. मो. शा. शहाणे, रा. व्ही. के. अय्यर, रा. ब. द. वा. शिदोरे, डॉ. य. खु. देशपांडे व प्रा. श्री. ना. बनहट्टी, यांनी परोपरीने जी मदत केली, तिजबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. 'तरुण भारत' 'महाराष्ट्र' 'उदय' 'मातृभूमि' 'लोकमत' 'Indian P. E. N.' इत्यादि नियतकालिकांनी 'युगवाणी'विषयी सहानुभूति प्रगट केली, तिजबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

विदर्भांतील व विदर्भाबाहेरील ज्या साहित्यिकांनी माझ्या विनंतीस मान देऊन आतापर्यंत निरपेक्ष लेखनसाहाय्य केलें व पुढेहि करण्याचें अभिवचन दिलें, त्यांचे आभार मानण्यास मजजवळ पुरेसे शब्द नाहीत. 'युगवाणी' वर त्यांनी असाच कृपालोभ ठेवावा, यापलीकडे मी अधिक काय म्हणूं शकतों?

साभार पोचः—'तरुण भारत' (दैनिक)-संपादक, ग. त्र्यं. माडखोलकर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघवार्ता

(सरचिटणिसांकडून)

विदर्भ-साहित्य-संघाच्या पुनरुज्जीवनानंतर डॉ. य० खु० देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली अकोट (जि. अकोला) येथे भरलेल्या आठव्या विदर्भ-साहित्य-सम्मेलनापासून दर्यापूर येथे ता० २३, २४ व २५ डिसेंबर १९४५ या तारखांस भरलेल्या नवव्या विदर्भ-साहित्य-संमेलनापर्यंतचा विदर्भ-साहित्य-संघाचा अहवाल, दर्यापूर सम्मेलन प्रसंगीं प्रसिद्ध करण्यांत आलाच आहे. त्यापुढील ठळक घटना खाली देण्यांत येत आहेत.

दर्यापूरचें विदर्भ साहित्य सम्मेलन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे विदर्भ साहित्य सम्मेलनाचें नववें अधिवेशन, **प्रा. श्री. ना. वनहट्टी** यांच्या अध्यक्षतेखाली, दर्यापूर (जि. अमरावती) येथे ता. २३, २४ व २५ डिसेंबर १९४५ या तारखांस अत्यंत यशस्वी रीतीने पार पडलें. या अधिवेशनाचें उद्घाटन या प्रांतांतील न्यायमूर्ति डॉ० **सर भवानीशंकर नियोगी** यांच्या हस्तें झालें. या सम्मेलन प्रसंगीं स्वागताध्यक्ष रा. बाबासाहेब सांगळोदकर पाटील, उद्घाटक सर भवानीशंकर नियोगी व अध्यक्ष प्रा. श्री. ना. वनहट्टी यांचीं भाषणें विद्वत्ताप्राचुर व वि. सा. संघाला कार्याची नवी दिशा दाखविणारीं अशींच झालीं. हीं सर्व भाषणें त्या त्या वेळीं वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालींच आहेत.

विद्वान साहित्यिकांचीं भाषणें व चर्चा

या सम्मेलनांत महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध साहित्यिक व नाटककार आणि म. सा. सम्मेलनाचे अध्यक्ष रा. मामासाहेब वरेरकर यांचें 'मराठी भाषेंतील लढाऊ वाङ्मय' या विषयावर व या प्रान्तांतील प्रभावी वक्ते आचार्य दादासाहेब धर्माधिकारी यांचें 'वाङ्मयाचें उद्दिष्ट' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झालें. त्याचप्रमाणें 'काव्य, नाटक, कादंबरी व लघुकथा या ललित-वाङ्मय-प्रकारांत सर्वांत अधिक प्रभावी वाङ्मय-प्रकार कोणता?' या विषयावर अतिशय मनोरंजक व उद्बोधक अशी चर्चा झाली. या चर्चेत रा. ल. ज. खरे, रा. मो. ज्ञा. शहाणे, डॉ. मा. गो. देशमुख, प्रिं. वि. न. मोहगांवकर, प्रा. वा. कृ. चोरघडे, मुंबईचे वृत्तपत्रकार व साहित्यिक रा. प्रभाकर पाध्ये इत्यादि चिकित्सक वक्त्यांनी भाग घेतला होता. अध्यक्ष वनहट्टी यांचा समारोप चर्चेस साजेसा झाला. वरील भाषणें आणि ही चर्चा यांमुळे या सम्मेलनाला विशेषच शोभा आली.

सम्मेलनाने मंजूर केलेले ठराव

या सम्मेलनांत एकूण अकरा ठराव मंजूर करण्यांत आले. ते सविस्तरपणें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेच आहेत. त्या ठरावांत भाषावार नभोवाणी केन्द्र, प्रसिद्धि खात्यांत भाषांतरासाठी मराठी विभाग, मराठी भाषेच्या सेवेची विधायक अष्टसूत्री, भाषावार प्रांतरचना, प्राथमिक शाळांतील मातृभाषाशिक्षणपद्धति, साक्षरता-प्रसार इत्यादि विषयांवर मंजूर झालेले ठराव विशेष उल्लेखनीय आहेत.

करमणुकीचे कार्यक्रम

दर्यापूर स्वागत समितीने या सम्मेलनांत करमणुकीचे जे कार्यक्रम आखले होते, ते स्वागत समितीच्या संयोजनकौशल्याची भरपूर साक्ष पटविणारे होते. ता. २३ ला रात्रीं पुण्याच्या स. प. कॉलेज मधील विद्यार्थिनी कु० माणिक दादरकर यांच्या गायनाचा सुश्राव्य कार्यक्रम झाला. ता. २४ ला रात्रीं प्रान्तांतील कवींचा व काव्यगायकांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमांत कवि दत्तात्रय, पां. श्रा. गोरे, सौ. शहाणे, कु. हतवळणे, रा. गलगलीकर, रा. अग्रवाल—इत्यादि स्त्रीपुरुष काव्यगायकांनी भाग घेतला होता. हा कार्यक्रमहि कल्पनेबाहेर यशस्वी झाला.

दर्यापूर येथील वि. सा. सम्मेलनाच्या नवव्या अधिवेशनाचें हें वैशिष्ट्य होतें की, अकोट सम्मेलनाने नेमलेल्या घटना-समितीने तयार केलेल्या व त्या वेळच्या विदर्भ-साहित्य-संघाच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या घटनेप्रमाणे हें पहिलें अधिवेशन भरलें होतें. हें अधिवेशन अतिशय शिस्तीने, वक्तशीरपणाने व वैभवाने पार पाडण्यांत स्वागत समितीने जें यश मिळविलें, त्याबद्दल स्वागत समिति धन्यवादास पात्र आहे. विशेषतः रा. सांगळोदकर पाटील, रा. श्रीवास्तव, रा. भाऊसाहेब खरे, रा. खोडे, रा. महाजन, रा. धर्माधिकारी हे कार्यकर्ते व त्यांचे सहकारी मित्र यांचा विशेष गौरवाने उल्लेख केला पाहिजे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्यकारी मंडळाच्या सभा.

ता. २३ व ता. २५ डिसेंबर रोजीं संमेलनाच्या ठिकाणीं वि. सा. संघाच्या १९४६ सालच्या नव्या कार्यकारी मंडळाच्या दोन सभा दर्यापूर येथे झाल्या. ता. २३ डिसेंबर रोजीं भरलेल्या सभेंत अध्यक्षाखेरीज इतर पदाधिकाऱ्यांची निवडणूक झाली. सर्व पदाधिकाऱ्यांसह विदर्भ-साहित्य-संघाचें यंदाचें कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे आहेः—

अध्यक्ष—प्रा. श्री. ना. बनहट्टी, नागपूर.
उपाध्यक्ष—रा. ब. द. वा. शिदोरे, अमरावती.
मरचिटणीस-रा. ना. कृ. दिवाणजी, अमरावती.
चिटणीस--१. रा. प्र. ना. खोडे, दर्यापूर.
(हल्ली मु० अकोला.)
२. प्रा. अ. ना. देशपांडे, नागपूर.
३. डॉ. द. शं. सरनाईक, पुसद.
संपादक--रा. वा. ना. देशपांडे, यवतमाळ.
खजीनदार-रा. द. शं. फडके, अमरावती.
सभासद--१. डॉ. य. खु. देशपांडे, यवतमाळ.
२. प्रा. वि. भि. कोलते, नागपूर.
३. डॉ. मा. गो. देशमुख, अमरावती.
४. प्रा. या. मु. पाठक, नागपूर.
५. प्रा. वा. कृ. चोरघडे, वर्धा.
६. रा. वि. कृ. पैठणकर, अमरावती.
७. रा. शं. ना. सहस्रबुद्धे, अमरावती.
८. रा. दा. के. ओक, नागपूर.
९. सौ. ताराबाई पाध्ये, अमरावती.

याशिवाय या दोन सभांत जमाखर्चाचें अंदाजपत्रक, हिशेबतपासनिसांची नेमणूक, वि. सा. संघाच्या प्रचाराची योजना, वि. सा. सम्मेलनानें मंजूर केलेल्या ठरावांची अम्मलबजावणी, वि. सा. संघाचें मुखपत्र 'युगवाणी,' इत्यादि विषयांवर विचारविनिमय झाला.

त्यानंतर ता. ३ फेब्रु. ४६ ला अमरावती येथे संघाच्या कचेरींत कार्यकारी मंडळाची तिसरी सभा झाली. या सभेंत दर्यापूर सम्मेलनांत मंजूर झालेल्या ठरावाच्या अम्मलबजावणीची निश्चित योजना आखण्यांत आली. याशिवाय अकोट सम्मेलनानें मंजूर केलेल्या ठरावांपैकीं ज्या ठरावांची अम्मलबजावणी व्हावयाची राहिली होती त्यांच्या अम्मलबजावणीचीहि निश्चित योजना आखण्यांत आली. तसेंच 'युगवाणी' च्या प्रकाशनाला हिंदुस्थान सरकारची परवानगी मिळविण्याची खटपट, नवीन झालेल्या सभासदांच्या अर्जास मान्यता, वर्ध्याचे प्रा. चोरघडे यांच्या मार्फत वि. सा. संघाकडे आलेली आगरकर चरित्रावरील बक्षिसाची योजना, याहि विषयांवर निर्णय घेण्यांत आले.

याच सभेंत वि. सा. संघाच्या नवीन कार्यकारी मंडळावर निवडून आलेले या प्रांतांतील वयोवृद्ध साहित्यिक व वाङ्मयसंशोधक रा. दा. के. ओक यांच्या शोचनीय निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला. कै० ओक यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या जागीं अमरावती येथील तरुण साहित्यिक रा. मा. ल. व्यवहारे यांची सर्वानुमतें निवड करण्यांत आली.

संघाच्या साधारण सभा

दर्यापूर येथे सम्मेलनाच्या ठिकाणीं वि. सा. संघाची साधारण सभा ता. २४-१२-४५ रोजीं दुपारीं झाली. या सभेंत वि. सा. संघाचा सन १९४५ चा अहवाल व जमाखर्च मंजूर करण्यांत आला. याच सभेंत वि. सा. संघाच्या घटनेंत सर्वानुमतें कांही दुरुस्ती करण्यांत आली. या साधारण सभेने मंजूर केलेल्या दुरुस्त्या छापवून घेऊन सभासदांच्या माहितीकरितां सर्वांकडे लवकरच रवाना करण्यांत येतील. याशिवाय ता. २३ डिसेंबर ४५ रोजीं कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या ठरावांस मान्यता देण्यांत आली. १९४५ सालीं वि. सा. संघाच्या कार्यांत ज्यांनी हस्तें परहस्तें मदत केली, त्या सर्वांचे अध्यक्ष डॉ. य. खु. देशपांडे यांनी अन्तःकरणपूर्वक आभार मानले.

या सभेनंतर ता. ३-२-४६ रोजीं संघाच्या घटनेंत अध्यक्षांनी सुचविलेल्या कांही दुरुस्त्यांच्या विचारासाठी संघाची साधारण सभा अमरावती येथे बोलावण्यांत आली होती. परंतु गणसंख्येच्या अभावीं ही सभा त्या दिवशीं तहकूब करण्यांत आली.

वि. सा. संघाच्या ४५ सालच्या सभासदांची यादी मागे प्रसिद्ध करण्यांत आली आहे. नवीन झालेल्या सभासदांची यादी पुढील अंकीं प्रसिद्ध करण्यांत येईल. १९४५ सालीं झालेल्या सभासदांनी चालू सालची वर्गणी त्वरित पाठवावी अशी विनंती आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष–

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे ग्रंथ

ज्ञानोपासना आणि भारतीयांचें कर्तव्य (दुसरी आवृत्ति) कि. २ रु.

सध्याच्या राष्ट्रीय जागृतीच्या काळीं या ग्रंथाचें वाचन प्रत्येकानें करणें अवश्य आहे.

मयूरकाव्यविवेचन कि. २॥. रु.

कविवर्य मोरोपंतांवरील प्रमाणभूत ग्रंथ

एकावळी कि. १॥. रु.

विख्यात साहित्यिकांची सुंदर व्यक्तिचित्रें

विष्णुपदी कि. ४ रु.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे संकलित लेख–सुमारें ३०० पानें दुर्मिळ व अप्रसिद्ध मजकूर.

'युगवाणी' मासिकाचे संपादक

श्री. वामन नारायण देशपांडे यांचा काव्यसंग्रह

आराधना

महाविदर्भांत सर्वोत्कृष्ट ठरून नागपूर विद्यापीठातर्फे क. ना. बेहेरे पारितोषिक मिळविणारा सर्वोत्कृष्ट काव्य ग्रंथ.

फक्त १० रु. मनीआर्डरीने पाठविणारांस वरील ग्रंथ रजिस्टर्ड पोस्टाने वरपोच पाठविण्यांत येतील.

सुविचार प्रकाशन मंडळ लि०
कांग्रेसनगर, नागपूर.



अनुक्रमणिका